सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२५३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.५ नोव्हेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## 'बंटेंगे तो कटेंगे'... योगी आदित्यनाथ ठरणार निवडणुकीत 'ट्रम्प कार्ड'

### पंतप्रधान मोदींपेक्षा जास्त सभा घेणार!



विदर्भ प्रजासत्ताक
दि. ५ मुंबई

राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. निवडणूक प्रचाराला आता वेग आला असून काँग्रेस, भाजपसह सर्वच पक्षांच्या स्टार प्रचारकांचे दौरे सुरू झाले आहेत. अनेक बडे नेते पुढील १३ दिवस महाराष्ट्राचा झंझावाती दौरा करणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रात ११ सभा घेणार आहेत. नरेंद्र मोदींच्या जाहीर सभा ८ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहेत. तर ६ नोव्हेंबर रोजी राहुल गांधी आरएसएसचा बालेकिल्ला असलेल्या नागपुरातून निवडणूक प्रचाराला सुरुवात करणार आहेत.

विधानसभा निवडणुकीसाठी १८ ऑक्टोबरला सायंकाळी निवडणूक प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. त्यापूर्वी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आणि भाजपचे 'ट्रम्प कार्ड' साबित झालेले योगी आदित्यनाथ मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात १५ निवडणूक सभांना संबोधित करणार आहेत. योगी आदित्यनाथ हे पंतप्रधान नरेंद्र मोदींपेक्षा जास्त प्रचार सभांना हजेरी लावतील. त्यामुळे योगी आदित्यनाथ यांची महाराष्ट्रातील उपस्थिती आणि 'बंटेंगे तो कटेंगे' या घोषणेचा परिणाम राज्यातील विधानसभा निवडणुकीतही दिसून येईल, असे जाणकारांचे मत आहे.

दरम्यान, नुकत्याच झालेल्या हरयाणा आणि जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीत योगी आदित्यनाथ यांचा करिष्मा दिसून आला. योगी आदित्यनाथ यांचा जम्मू-काश्मीरमध्ये स्ट्राइक रेट ९० टक्के आणि हरयाणामध्ये जवळपास ६५ टक्के होता. जम्मूमध्ये योगींनी पाच विधानसभा मतदारसंघात निवडणूक रॅली घेतल्या, त्यापैकी चार जागा भाजपने जिंकल्या. किश्तवाड आणि कठुआसारख्या मुस्लिमबहुल जागा जिंकण्यात भाजपला यश आले.हरयाणातही योगी आदित्यनाथ यांनी २० विधानसभा मतदारसंघात प्रचार केला, त्यापैकी १३ जागा भाजपने जिंकल्या.भाजपला हरयाणात तिसऱ्यांदा सत्तेत आणण्यासाठी हा विजय महत्त्वाचा ठरला.

**हरयाणा ते कॅनडापर्यंत 'बंटेंगे तो कटेंगे'च्या घोषणा**

योगी आदित्यनाथ यांनी हरयाणाच्या निवडणुकीतच 'बंटेंगे तो कटेंगे'ची घोषणा केली होती. ही घोषणा इतकी लोकप्रिय झाली की भाजप समर्थकांनी मतदान नसलेल्या राज्यातही त्याचा वापर करण्यास सुरुवात केली. याशिवाय, कॅनडात झालेल्या मंदिरावरील हल्ल्यानंतर हिंदू समुदायाने आपल्या



निदर्शनावेळी 'बंटेंगे तो कटेंगे' अशा घोषणा दिल्या. तसेच, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर मुंबईसह राज्याच्या अनेक भागात योगी आदित्यनाथ यांचे फोटो असलेले 'बंटेंगे तो कटेंगे'चे पोस्टर लावण्यात आले होते.

## जिवंत राहायचं असेल तर..., अभिनेता सलमान खानला पुन्हा लॉरेन्स बिश्नोई गँगची धमकी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.५मुंबई

बॉलिवूड अभिनेता सलमान खानला येणाऱ्या धमक्यांचे सत्र अद्यापही सुरूच आहे. सलमान खानला पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, यावेळी थेट सलमान खानला कॉल केला नाही, तर मुंबई पोलिसांच्या वाहतूक नियंत्रण कक्षाला हा धमकीचा मेसेज आला आहे. या धमकीत देखील लारेन्स बिश्नोईचं नाव समोर आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, काल रात्री मुंबई पोलिसांच्या वाहतूक विभागाच्या नियंत्रण कक्षाला धमकीचा मेसेज आला. धमकी देणाऱ्याने गँगस्ट लॉरेन्स बिश्नोईच्या नावाने धमकीवजा मेसेज केला आहे. या मेसेजमध्ये मी लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ बोलत असल्याचा दावा त्याने केला आहे. तसेच, सलमान खानला जिवंत रहायचं असेल तर त्याने आमच्या मंदिरात जाऊन माफी मागावी, नाहीतर पाच कोटी रुपये द्यावे. नाही दिल्यास आम्ही त्याला जीवे मारू. आमची गँग आजही सक्रिय आहे, असे म्हटले आहे. दरम्यान, याप्रकरणी वरळी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

दरम्यान, अभिनेता सलमान खान लॉरेन्स बिश्नोई गँगच्या निशाण्यावर आहे. १९९८ मध्ये काळविटाची शिकार केल्याचा आरोप सलमान खानवर आहे.

## श्री गणेशपूजेसाठी पंतप्रधानांनी माझ्या घरी येणे चुकीचे नाही, न्या. चंद्रचूड यांनी स्पष्ट केली भूमिका



विदर्भ प्रजासत्ताक
दि.५नवी दिल्ली

श्री गणेशपूजेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या निवासस्थानी येण्यात काहीही चुकीचे नसल्याचे सांगून अशा मुद्द्यावर राजकीय परिपक्वतेची गरज सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी व्यक्त केली.

येथे एका कार्यक्रमात बोलताना न्या. चंद्रचूड म्हणाले, सामाजिक पातळीवर विचार करता न्यायपालिका आणि कार्यपालिकांशी संबंधित व्यक्तींच्या सतत बैठका होत असतात. प्रजासत्ताक दिन किंवा इतर वेळी आम्ही राष्ट्रपती भवनात भेटत असतो. पंतप्रधान किंवा मंत्र्यांशी आम्ही चर्चा करतो. यात आम्हाला जे निकाल द्यावयाचे असतात त्यासंबंधी नव्हे, तर सामान्य जीवन आणि सामाजिक मुद्द्यांवर चर्चा होत असते. न्यायपालिका व कार्यपालिकेतील अधिकारांच्या वर्गीकरणाचा असा अर्थ होत नाही की, दोघांची भेट व्हायला नको.अयोध्येतील राममंदिर वादावर तोडगा निघावा म्हणून आपण देवाची प्रार्थना केली होती, असे सरन्यायाधीशांनी म्हटले होते. याबाबत विचारल्यावर न्या. चंद्रचूड म्हणाले, मी एक श्रद्धाळू माणूस आहे. सर्वच धर्माचा समान स्वरूपात मी सन्मान करतो. माझ्या निवृत्तीनंतर न्यायालय सुरक्षित हाती आहे, असे सांगून ते म्हणाले की, न्या. संजीव खन्ना हे अतिशय शांत स्वभावाचे आहेत. न्यायाधीशांवर संशय व्यक्त करणे म्हणजे यंत्रणेची बदनामी करण्यासारखे आहे.

## संविधानाच्या बाता मारणाऱ्या राहुल गांधींच्या कार्यक्रमात प्रसार माध्यमांवर बंदी

## ओबीसी युवा अधिकार मंचतर्फे नागपुरात ६ नोव्हेंबरला संविधान सन्मान संमेलन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.५नागपूर

अभिव्यक्ती स्वातंत्र आणि प्रसार माध्यमांच्या स्वातंत्र्याच्या कायम बाता मारणारे काँग्रेस नेते व लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नागपुरातील कार्यक्रमादरम्यान प्रसार माध्यमांना प्रवेश नाकारण्यात आला आहे. राहुल गांधींकडून कायम संविधानाची हत्या केली जातेय असा आरोप भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी केला आहे.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची धामधुम सुरू असताना ओबीसी युवा अधिकार मंचतर्फे नागपुरात ६ नोव्हेंबरला संविधान सन्मान संमेलन आयोजित करण्यात आलं आहे. रेशीमबाग येथील सुरेश भट सभागृहात सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत हा कार्यक्रम चालणार आहे. या



संमेलनात विदर्भातील वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी, सामाजिक संघटनांचे प्रमुख सहभागी होणार आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी या कार्यक्रमात उपस्थितांना संविधानाचा सन्मान या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. मात्र, एकीकडे राहुल गांधी संविधानिक मूल्यांची गोष्ट करत असताना दुसरीकडे लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या प्रसार माध्यमांना प्रवेश नाकारणे ही एकप्रकारे संविधानाची हत्याच आहे असा घणाघात भाजपाने केला आहे.


**काँग्रेसचा छुपा चेहरा समोर**

काँग्रेसकडून लोकसभा निवडणुकीमध्ये संविधान बदलवणार असा खोटा प्रचार करण्यात आला होता. आता नागपूरमध्ये होणाऱ्या संविधान सन्मान कार्यक्रमात प्रसार माध्यमांना बंदी घालण्यात आल्याने संविधानाच्या नावाखाली काँग्रेस कुठला वेगळा अजेंडा राबवत आहेत का? असा सवालही प्रविण दरेकरांनी उपस्थित केला आहे. या कार्यक्रमात प्रसार माध्यमांना प्रवेश नाकारून काँग्रेस पुन्हा एकदा संविधानाच्या नावावर खोटा प्रचार करत असल्याचेही दरेकरांनी म्हटलं आहे.

## महायुतीत मुख्यमंत्री पदासाठी कुठलीही रस्सीखेच नाही, कुणीही मागणी केलेली नाही; फडणवीस

विदर्भ प्रजासत्ताक
दि.५ नागपूर

आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीचा विजय झाल्यास मुख्यमंत्रिपदासाठी कुठल्याही प्रकारची रस्सीखेच होणार नाही. अशा कुठल्याही व्यवस्थेसाठी कुठल्याही प्रकारची आश्वासने देण्यात आलेली नाहीत. कारण आमच्याकडे आधीपासूनच पुढचा मुख्यमंत्री निवडण्यासाठी एक पद्धत आहे. एकनाथ शिंदेंसह आमच्या युतीतील कुठल्याही नेत्याने पदाची मागणी केलेली नाही. सर्वांना विश्वास आहे की, निर्णय निष्पक्षपणे होईल, असे राज्याचे उपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.



लोकसभा निवडणुकीतील महायुतीच्या कामगिरीसंदर्भात बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, सरकारने सुरू केलेल्या जन कल्याणकारी योजनांमुळे महाराष्ट्रात सत्ताधारी महायुतीसाठी प्रो-इनकंबन्सी बघायला मिळते. मी अत्यंत आत्मविश्वासत दिसत असेल, मात्र महाराष्ट्राच्या विविध भागांत आमच्यासाठी वास्तविक जन समर्थन आहे. याचे श्रेय आम्ही लागू केलेल्या विविध कल्याणकारी योजनांना जाते. आमच्या सरकारच्या गत अडीच वर्षात, लोकांनी विकास कामांचे प्रयत्न बघितले आहेत आणि हे सरकार सकारात्मक परिवर्तन आणेन असा विश्वास त्यांना आहे.

महाविकास आघाडीवर 'कटाक्ष' करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आमच्या योजनांसंदर्भात बोलताना, या योजनांसाठी पैसे कुठून आणणार? असा प्रश्न त्यांनी केला होता आणि आता आमच्याच योजनांद्वारे मिळणारा लाभ डबल करण्यासंदर्भात बोलत आहेत. एवढेच नाही, तर आम्हाला केंद्राचे समर्थन आहे. ही मोठ-मोठी आश्वासनं पूर्ण करण्यासाठी त्यांच्याकडे कुणाचे समर्थन आहे? असा प्रश्नही यावेळी फडणवीस यांनी केला.

'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेसंदर्भात बोलताना फडणवीस म्हणाले, आम्ही विकास आणि आमच्या कल्याणकारी योजनांना निवडणुकीच्या केंद्रस्थानी ठेवू. 'बटेंगे तो कटेंगे' म्हणण्यात काहीही चूक नाही. कारण एक दुभंगलेला समाज विनाशाला सामोरे जातो. ते आज तक वृत्तवाहिनीशी बोलत होते.

## राज ठाकरे म्हणाले शिवसेना बाळासाहेबांची प्रॉपर्टी, दीपक केसरकर म्हणाले, विचारांवर चालणाऱ्यांना प्रॉपर्टी मिळणार

विदर्भ प्रजासत्ताक
दि. ५ मुंबई

बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर चालणाऱ्या लोकांनांच त्यांची प्रॉपर्टी मिळणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे बाळासाहेबांच्या विचारांवर चालतात म्हणून लोक त्यांच्याबरोबर राहिले. मशालीपेक्षा त्यांना जास्त मते मिळाली असल्याचे मत मंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केले. राज ठाकरे यांनी केलेल्या टीकेला केसरकर यांनी प्रत्युत्तर दिलं. बाळासाहेबांचे विचार कोणी सोडले हे महाराष्ट्रातील जनतेला माहित असल्याचे केसरकर म्हणाले. दरम्यान, राज ठाकरे हे मोठे नेते आहेत. ते काय बोलले यावर माझ्यासारख्या छोट्या



माणसाने बोलणे योग्य नाही असे केसरकर म्हणाले.

सावरकरांचा ज्यावेळी अपमान झाला त्यावेळी बाळासाहेबांनी जोडो मारो आंदोलन सुरु केले होते. ते मंत्री मुंबईत पाऊल नाही टाकू शकले, ही बाळासाहेबांची ताकद होती. सावरकर यांच्याबद्दल राहुल गांधी यांनी काहीही बोलावे आणि आमच्या युवराजांनी त्यांना मिठी मारावी, हे चित्र सुद्धा आमच्या जनतेने पाहिले असं केसरकर म्हणाले.

## ठाकरे गटाची निवडणूक आयोगाकडे पुन्हा तक्रार; मिलिंद देवरांच्या प्रचारावर आक्षेप

विदर्भ प्रजासत्ताक
दि.५मुंबई

वरळी मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार मिलिंद देवरा यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना काढलेल्या शोभायात्रेत पैसे देऊन माणसं आणल्याचा आरोप करत ठाकरे गटाने मुख्य निवडणूक आयोगाला पत्र लिहिलं आहे. ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांनी देवरांनी काढलेल्या शोभायात्रेत लोकांना पैशाचे आमिष दाखवून आणल्याचा आरोप केला आहे.

याबाबत खासदार अनिल देसाईंनी पत्रात म्हटलंय की, वरळी विधानसभेतील शिवसेना शिंदे गट उमेदवार मिलिंद देवरा यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करतानाच्या शोभायात्रेचे व्हिडिओ जोडत आहोत. सदर शोभायात्रेत चित्रीकरण करणाऱ्या माध्यम प्रतिनिधींनी या शोभायात्रेत सहभागी लोकांना विचारले असता त्यांनी आपल्याला प्रत्येकी ५०० रुपये देऊन शोभायात्रेत सहभागी होण्यास सांगितल्याचे कॅमेऱ्यात कबुल केले. ज्याचे असंख्य व्हिडिओ सर्व प्रसिद्धी तसेच समाजमाध्यमांवर व्हायरल झाले आहेत.




निवडणूक आदर्श आचारसंहितेसंदर्भातील भारतीय राज्यघटनेच्या कलमानुसार पैशाचे आमिष दाखवणे हा गंभीर गुन्हा आहे. या गोष्टीची त्वरीत गंभीर दखल घेऊन याबाबतीत संबंधित अधिकाऱ्यांस निवडणूक आदर्श आचारसंहिता भंगाबाबत सख्त कारवाईचे निर्देश घ्यावेत व हा बेकायदेशीर खर्च वरळी विधानसभेचे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार मिलिंद देवरा यांच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करण्यात यावा अशी मागणी ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांनी निवडणूक आयोगाकडे पत्र लिहून केली आहे.दरम्यान, ठाकरे गटाच्या पत्राची दखल घेऊन मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी अतिरिक्त निवडणूक निर्णय अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत. वरील तक्रारीच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्यात यावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल २४ तासांत या कार्यालयास सादर करावा असं कळवण्यात आले आहे.



## संपादकीय ......

# अखेर जरांगे पाटलांची माघार !


दिवाळीच्या चार दिवसांच्या सणानंतर आता पुन्हा महाराष्ट्रातील राजकीय वातावरण आणि निवडणुकांच्या संबंधातील निर्णय यावर सगळ्यांचे लक्ष केंद्रित झाले आहे. आजचा दिवस महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसाठी खूप निर्णायक दिवस ठरला. आज दिवसभरात दोन महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. यातील सकाळची पहिली घडामोड म्हणजे, मनोज जरांगे यांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे आणि दुसरा तितकाच महत्त्वाचा निर्णय म्हणजे, निवडणूक आयोगाने राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तातडीने बदली केली आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या राजकारणाच्या दृष्टीने या दोन्ही अत्यंत महत्त्वाच्या घटना आहेत.

मनोज जरांगे यांनी निवडणुकीच्या संबंधात खूप आधीपासूनच वातावरण तापवले होते. आपले स्वतंत्र उमेदवार उभे करण्याच्या संदर्भात त्यांनी हालचाली चालू केल्या होत्या. त्यांच्यातर्फे उभे केले जाणारे उमेदवार कोणाला राजकीयदृष्ट्या लाभाचे किंवा अडचणीचे ठरणार याची गणिते मांडली जात होती. त्याचबरोबर या निर्णयामुळे मनोज जरांगे यांची महाराष्ट्राच्या राजकारणातील नेमकी ताकद किंवा प्रभाव जोखला जाणार होता. त्यामुळे त्यांच्या निर्णयाला आपसूकच राजकीय महत्त्व प्राप्त झाले होते. जरांगे यांनी त्या अनुषंगाने नियोजनबद्ध हालचाली केल्याचेही जाणवले. त्यांनी इच्छुकांचे अर्ज मागवून घेतले, त्यांच्यापैकी काहींच्या मुलाखती पण घेतल्या.

त्यानंतर स्ट्रॅटेजीकली उमेदवार उभे करण्याचा निर्णय घोषित केला. या सगळ्या घडामोडी पाहता ते निवडणुकीच्या रिंगणात उतरणारच हे जवळपास निश्चित झालेले असताना त्यांनी अचानक निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे. या निर्णयाचे दोन अन्वयार्थ निघतात. त्यातील पहिला अन्वयार्थ असा की, जरांगे यांचा हा निर्णय महाविकास आघाडीसाठी लाभदायक आणि महायुतीसाठी धोकादायक ठरू शकतो. दुसरा अन्वयार्थ असा की, त्यांनी आता निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतल्याने जरांगे यांची झाकली मूठ तशीच राहणार आहे.अन्यथा त्यांनी जर निवडणुकीच्या रिंगणात खरंच उडी घेतली असती आणि त्यात जर त्यांना अपेक्षित यश मिळू शकले नसते, तर त्यांचा जो एकूण प्रभाव महाराष्ट्रभर दिसत होता, त्याला ओहोटी लागली असती. त्यामुळे त्यांचा माघारीचा निर्णय चाणाक्षपणाचाच ठरला आहे असे म्हणता येईल. आज जरांगे यांनी जे निवेदन केले आहे, त्यातील एक वाक्य महत्त्वाचे आहे. त्यांनी आपल्या समर्थकांना आवाहन केले आहे की, 'निवडणुकीत कोणाचाही पुरस्कार करू नका किंवा कोणालाही पाठिंबा देऊ नका.गुपचूप मतदान करून आपल्याला जे पाडायचे आहेत त्यांना पराभूत करा'. त्यांच्या आवाहनाचा योग्य संदेश त्यांच्या समर्थकांपर्यंत गेला असून त्यातून आता महायुतीला विशेषतः भाजपला आव्हानात्मक स्थिती निर्माण होणार आहे हे मात्र नक्की. कारण त्यांचा सुरुवातीपासूनचा राग केवळ फडणवीस आणि भाजप यांच्यावरच होता आणि त्यांना पराभूत करण्याची भाषा त्यांनी वेळोवेळी व्यक्त केली होती. भारतीय जनता पक्षासाठी आज दुसरा धक्कादायक निर्णय ठरला तो म्हणजे निवडणूक आयोगाने केलेली पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली. रश्मी शुक्ला या केवळ भाजपसाठीच काम करीत असल्याचा काँग्रेस नेते नाना पटोले आणि अन्य नेत्यांचा स्पष्ट आरोप आहे.रश्मी शुक्ला या सेवेतून अधिकृतपणे निवृत्त झालेल्या असताना त्यांना दोन वर्षांची मुदतवाढ दिली गेली. ही मुदतवाढच बेकायदेशीर होती असे विरोधी पक्षांच्या नेत्यांचे म्हणणे आहे. तरीही महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुका लक्षात घेऊन त्यांना पोलीस महासंचालक पदावर नेमले गेले आणि त्यांच्या अखत्यारितच या निवडणुका घेऊन निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा भाजप आणि महायुतीचा प्रयत्न होता, या प्रयत्नाला निवडणूक आयोगाच्या आदेशामुळे खीळ बसली आहे. झारखंडमध्ये 'इंडिया आघाडी'चे सरकार आहे. तेथे भाजप विरोधात आहे, त्या राज्यातही सध्या निवडणूक प्रक्रिया सुरू आहे.

त्यामुळे झारखंडच्या पोलीस महासंचालकांना बदलण्याची मागणी भारतीय जनता पक्षाने केल्यानंतर निवडणूक आयोगाने तेथील पोलीस महासंचालकांची त्वरित बदली केली परंतु महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीकडून निवडणूक आयोगाकडे रश्मी शुक्ला यांची बदली करण्याची लेखी मागणी करूनही त्यावर अजून निर्णय होत नव्हता. आज अखेर निवडणूक आयोगाने तो निर्णय घेऊन टाकला. या निर्णयाचे काँग्रेस नेत्यांनी स्वागत केले असले तरी शुक्ला यांना हटवण्यासाठी इतका वेळ का लागला याची माहिती त्यांना हवी आहे. तसेच रश्मी शुक्ला यांना केवळ पोलीस महासंचालक पदावरून हटवणे पुरेसे नाही, तर त्यांना पोलीस सेवेतूनच कायमची सुट्टी द्यावी अशीही काँग्रेसची मागणी आहे. त्याचबरोबर रश्मी शुक्ला यांच्याकडे निवडणुकीशी संबंधित कोणताही कार्यभार सोपवला जाऊ नये अशी आग्रही मागणी आता प्रदेश काँग्रेसने लावून धरली आहे. आजचे हे दोन्ही निर्णय महायुतीसाठी अडचणीचे ठरले आहेत असा निष्कर्ष निघतो. रश्मी शुक्ला यांच्यामार्फत प्रशासकीय यंत्रणेवर दबाव ठेवण्याचा सत्ताधाऱ्यांचा जो प्रयत्न होता त्याला खीळ बसली आहे असे विरोधकांचे म्हणणे आहे, त्यात बर्यापैकी तथ्य आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर विरोधकांचा मांडला जाणारा मुद्दा सहज लक्षात येऊ शकतो. उशिरा का होईना निवडणूक आयोगाने लोकांच्या मनात संभ्रम शिल्लक राहणार नाही असा निर्णय घेत रश्मी शुक्ला यांना हटवले आहे, तो निर्णय लोकशाही प्रक्रियेला अनुकूल असाच म्हणावा लागेल, त्यामुळे या निर्णयाचे स्वागत करणे उचित ठरते.

# किंगमेकर नेमके कोण?



अलीकडेच एका दुपारी तीन वाजेपर्यंत बर्याचशा बंडोबांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली. आपलाच उमेदवार निवडून यावा म्हणून डझनभर पक्ष चढाओढीने राजकारण करत आहेत. एका मतदारसंघामध्ये एका आमदारकीच्या जागेसाठी प्रत्येक पक्षात किमान डझनभर लोक इच्छुक होते आणि निवडणुकीची तयारी करून बसले होते. यापैकी एकालाच उमेदवारी मिळणार असल्यामुळे प्रत्येक पक्षात बलवान असे किमान अर्धा डझन उमेदवार गुडघ्याला बाशिंग बांधून तयार होते. शारीरिक, मानसिक आणि आर्थिक तयारी करून बसलेल्या या भावी आमदारांना शांत करणे हे अवघडच काम होते.

समजूत घालून, दबाव टाकून, वेळप्रसंगी धमकी देऊन किंवा काही तरी देण्याचे आमिष दाखवून बंडखोरांना शांत करण्याचे प्रयत्न प्रत्येक पक्षातील वरिष्ठ नेते करत होते. बंडखोरी सगळीकडेच वाढीला लागली आहे, असे तुमच्या लक्षात येईल. सून सासूचे ऐकत नाही आणि मुलगा बापाचे ऐकत नाही. एका संघटनेच्या चार संघटना होतात याचे कारण म्हणजे बंडखोरी. कुणी कुणाच्या नियंत्रणात राहायला तयार नसते, तेव्हा असे प्रकार वाढीला लागतात. काही बंडखोरांना राज्यपाल कोट्यातून मिळणारी आमदारकी देण्याचे आमिष दाखवण्यात आले आहे, अशी चर्चा आहे. राज्यपाल कोट्यामध्ये १२ लोकांना आमदार करता येते. आचारसंहिता लागण्यापूर्वी सात लोकांची वर्णी या ठिकाणी लागली आहे. अजूनही पाच जागा सत्ताधारी पक्षाने राखून ठेवलेल्या आहेत. 'या पाच जागांपैकी एक जागा तुम्हालाच देऊ,' असे आश्वासन प्रत्येक पक्षाने आपल्या किमान २०० तरी बंडखोरांना दिलेले असावे, असे वाटते. 'मी फॉर्म परत घेणार नव्हतो; पण मोठ्या साहेबांचा फोन आला. त्यांचा शब्द मला टाळता येत नाही,' असे म्हणत काही बंडखोर माघार घेते झाले. काही झाले तरी आमदार होणारच, असे ठरवून बसलेले असंख्य बंडखोर अद्याप मैदानात आहेत आणि प्रयत्नाला लागले आहेत. हा सगळा आटापिटा कशासाठी चालला आहे, असा प्रश्न तुमच्या मनात उभा राहत असेल.

सर्व पक्षांना तसेच सर्व अपक्षांना या निवडणुकीनंतर किंग म्हणजेच मुख्यमंत्री कोण होणार, याविषयीचा काही अंदाज नाही. आपला राजा होईल का, याविषयी प्रत्येकाच्या मनात शंका आहे. ४०-५० जागा निवडून आल्या तर आपण किंग नाही तर नाही, पण कमीत कमी किंगमेकर होऊन राज्याच्या राजकारणामध्ये मोठी भूमिका बजावू शकतो, याची प्रत्येकाला खात्री आहे. काहीही करून, सर्व पैसे पणाला लावून आपण निवडून आलो तर येत्या काळामध्ये प्रत्येक अपक्षाला महत्त्व असणार आहे, अशी अपक्षांची भूमिका आहे. याचा अर्थ आपणच किंगमेकर होऊ, असे अपक्षांनाही वाटत आहे. पुढे काय होणार आहे, हे मात्र फक्त नियतीलाच माहीत आहे. किंगमेकर होण्यासाठी प्रयत्न करणार्या लोकांची संख्या मात्र आता सध्या खूप आहे. भविष्यात किंग कोण होईल आणि खरे किंगमेकर कोण असतील, हे पाहणे मनोरंजक असणार आहे. कोणतेही क्षेत्र असो, पडद्यामागचा सूत्रधार महत्त्वाचा असतो. तोच सगळी सूत्रे हलवत असतो. त्याला आपल्या मनाप्रमाणे सर्व काही घडायला हवे, असे वाटत असतो. मग तो आपली सर्व शक्ती पणाला लावत असतो. त्यातही राजकारणातील किंगमेकर तर खूपच चतुर असतो. चला तर मग, घोडे मैदान लांब नाही. कोण किती पाण्यात आहे, हे कळेलच!

# ढेमसे भाजीपाला पिकाची सुधारित पद्धतीने कशी कराल लागवड?

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक**

ढेमसे १४० ते १५० दिवसाचे भाजीपाला पिक आहे. साधारणपणे लागवडीपासून ७५ ते ८० दिवसांनी तोडणी सुरु होते. अधिक उत्पादनासाठी लागवड तंत्र जाणून घेणे आवश्यक आहे.

**जमीन व हवामान**

मध्यम काळी निचऱ्याची, परंतु हलकी जमीन तसेच उष्ण व कोरडे हवामान या पिकास चांगले मानवते. १८ ते ३० डिग्री सें. तापमानात बियांची उगवण आणि ३० ते ३५ डिग्री सें. तापमानात पिकाची शारिरीक वाढ चांगली होते. अति उष्ण व दमट हवामान या पिकास मानवत नाही.

**सुधारित जाती**




अर्का टिंडा, पंजाब टिंडा, टिंडा एस.-४८३, अर्का अन्नामलाई इत्यादी.

**लागवड हंगाम**

उन्हाळी: जानेवारी-फेब्रुवारी

खरीपः जुलै- ऑगस्ट

बियाण्याचे प्रमाण

३ ते ४ किलो/हेक्टर

**बीजप्रक्रिया–** बियाणे २४ ते ४८ तास ओल्या कापडात बांधून ठेवावे. लागवडीपूर्वी 'कार्बेन्डॅझीम' या बुरशीनाशका च्या द्रावणात बुडवून लावावे.

**लागवडीचे अंतर**

दोन ओळीतील अंतर १ मिटर, दोन वेलीतील अंतर ०.६० मिटर तसेच ३० मायक्रॉन जाडीच्या काळ्या-चंदेरी रंगाच्या कापडाचा आच्छादनासाठी उपयोग करावा

**खात व्यवस्थापन**

१० ते १५ टन शेणखत प्रति हेक्टर. लागवडीपूर्वी २५:५०:५० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रति हेक्टर आणि लागवडीनंतर ३० दिवसांनी २५ किलो प्रति हेक्टर नत्र खताची मात्रा बांगडी पध्दतीने द्यावी. आच्छादन केलेले असल्यास ठिबक सिंचनमधून खते द्यावीत. पिकाच्या जोमदार वाढीसाठी खुरपणी करून शेत स्वच्छ ठेवावे.

**पाणी व्यवस्थापन–** लागवडीच्यावेळी सऱ्या ओलवून घ्याव्यात व नंतर लागवड करावी. खरीप हंगामात आणि उन्हाळी हंगामात असल्यास ५ दिवसाच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. पीक फुलावर व फळधारणेच्या काळात पाण्याचा ताण आल्यास फूलगळ होते. फळांच्या संख्येत आणि वजनात घट येते.

**फळांची काढणी–** साधारणपणे लागवडीपासून ७५ ते ८० दिवसांनी तोडणी सुरु होते. जाती परत्वे ७ दिवसांच्या अंतराने १० ते १२ तोडण्या होतात. ढेमसे फळावर बारीक लव असते आणि नखाने दाबल्यास त्यावर ठसा उमटतो. त्यास कोवळे फळ समजावे. ढेमश्याची फळे लुसलुशीत कोवळी असताना काढणी करावी.

# डाळिंब संशोधन केंद्र सोलापूरची आली ही नवीन बायोफोर्टीफाइड जात

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक**

राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर यांनी डाळिंबाची सोलापूर लाल ही बायोफोर्टीफाइड जात विकसित केली आहे. त्याबाबत माहिती विस्तृतपणे माहिती पाहूया.

सोलापूर लाल ची वैशिष्ट्ये

– सोलापूर लाल ही जात बायोफोर्टीफाइड जात आहे.

– त्यामध्ये मोठ्या प्रमाणात लोह (५.६-६.१ मिग्रॅ/१००ग्रॅ. दाणे), जस्त (०.६४-०.६९ मिग्रॅ/१०० ग्रॅ दाणे), अॅन्थोसाइनिन (३८५-३९५ मिग्रॅ/१०० ग्रॅ दाणे) आणि जीवनसत्तव क (१९.४-१९.८ मिग्रॅ/१००ग्रॅ दाणे), हे गडद लाल, जास्त टीएसएस (१७.५-१७.७ डिग्री बीक्स) इ.

– फळ उत्पादकता (२३-२७ टन हे.)

– टपोरे दाणे आहेत.

– खाण्यासाठी आणि प्रक्रिया उद्योगासाठी ही जात अत्यंत योग्य आहेत.

– फुल धारणेनंतर सोलापूर लाल ही प्रजाती १६५ दिवसांनी परिपक्व होते.

– वेगवेगळ्या वातावरणाच्या आणि हाताळणीच्या पद्धती अंतर्गत याचा कालावधी वेगवेगळा येवू शेकतो.

या जातीला बायोफोर्टीफाइड का म्हटले जाते?




ज्या प्रजातीमध्ये मोठ्या प्रमाणात पोषणद्रव्ये, प्रामुख्याने, जीवनसत्त्वे, खनिजे इत्यादी. त्याच्या खाण्याच्या भागात असतात त्याला बायोफोर्टीफाइड प्रजाती असे म्हणतात. मानवी जीवनातील कुपोषणाची कमतरता भरुन काढण्याचे प्रमुख कार्य बायोफोर्टीफाइड प्रजाती करतात.

सोलापूर लाल आणि भगवा यातील फरक

१) सोलापुर लाल ही प्रजाती बायोफोर्टीफाइड प्रजाती आहे. आणि भगव्याच्या तुलनेत ही गडद लाल, जास्त टीएसएस, फळ उत्पादन, लोह, जस्त, अॅन्थोसायनीन आणि जीवनसत्व क असलेली त्याबरोबरच टपोरे दाणे, प्रक्रिया उद्योगासाठी व खाण्यासाठी अत्यंत योग्य आहे.

२) सोलापूर लाल ही प्रजाती फुल धारणेनंतर १६५ दिवसांनी परिपक्व होते तर भगवा फुल धारणेनंतर १८० दिवसांनी परिपक्व होतो. म्हणजे सोलापूर लाल ही भगवाच्या तुलनेत १५ दिवसांनी लवकर पक्व होतो.

कृषी विशेष




# थुलथुलीत पोट होईल सपाट - बॅड कोलेस्टेरॉलही येईल नियंत्रणात; फक्त रोज चमचाभर 'ही' चटणी खा

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक**

वजन कमी करण्यासाठी आपण विविध उपाय करून पाहतो. पण यामुळे वजन कमी होईलच असे नाही वजन कमी करण्यासाठी व्यायामासह डाएट देखील महत्वाचं आहे. पण तरीही हवा तसा रिझल्ट दिसून येत नाही. वेट लॉससाठी डाएटला खूप महत्व आहे. जर डाएट बिघडलं, तर व्यायाम करूनही वजन घटत नाही. मन मारून आपण बरेच पदार्थ खाणं टाळतो. जर आपण बेचव पदार्थ खाऊन वजन कमी करत असाल तर, असं करू नका, आपण आहारात कडीपत्त्याच्या चटणीचा समावेश करू शकता.

भारतीय घरांमध्ये कढीपत्ता मोठ्या प्रमाणात वापरला जातो. यात फायबर्स आणि हायपोग्लायसेमिकगुण असतात. ज्यामुळे इन्शुलीन एक्टिव्हीटीज वाढतात आणि इम्यूनिटीसुद्धा चांगली राहते.

याव्यतिरिक्त त्यात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी आणि व्हिटॅमिन सी असते. यासह यात अनेक एंटी ऑक्सिडेंट्स असतात. ज्यामुळे आरोग्य सुदृढ राहते. नियमित कडीपत्ता खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते आणि मेटाबॉलिझ्म बुस्ट होते. त्यामुळे आपण नियमित चमचाभर चमचमीत कडीपत्त्याची चटणी खाऊ शकता.

**कडीपत्त्याची चमचमीत चटणी करण्यासाठी लागणारं साहित्य**

कडीपत्ता, शेंगदाणे, लसूण, लाल सुकी मिरची, जिरं, पांढरे तीळ, हिंग, सुकं खोबरं, आमचूर पावडर, मीठ, तेल

**कृती–** सर्वात आधी पॅन गरम करण्यासाठी ठेवा. त्यात २ चमचे तेल घाला. तेल गरम झाल्यानंतर त्यात कडीपत्त्याची पानं घालून भाजून घ्या. कडीपत्त्याची पानं कुरकुरीत भाजून झाल्यानंतर एका प्लेटमध्ये काढून घ्या. कडीपत्ता भाजल्यामुळे त्यातील कडूपणा निघून जाईल.आता त्यातच पुन्हा



२ चमचे तेल घाला. नंतर त्यात अर्धी वाटी शेंगदाणे घालून भाजून घ्या. नंतर त्यात ६ - ७ लसणाच्या पाकळ्या, ४-५ लाल सुक्या मिरच्या घालून भाजून घ्या. नंतर त्यात २ चमचे जिरं, पांढरे तीळ घालून भाजून घ्या.

नंतर गॅस बंद करा. आणि त्यात चिमुटभर हळद, किसलेलं सुकं खोबरं घालून साहित्य मिक्स करा.

भाजलेलं सर्व साहित्य थंड होण्यासाठी एका प्लेटमध्ये काढून ठेवा. नंतर मिक्सरच्या भांड्यात काढून घ्या. त्यात चवीनुसार मीठ, अर्धा चमचा आमचूर पावडर घालून वाटून घ्या. अशा प्रकारे चमचमीत कडीपत्त्याची चटणी खाण्यासाठी रेडी. त्यात चटणी हवाबंद डब्यात साठवून ठेवा.

ही चटणी फ्रिजमध्ये ठेवल्यास, महिनाभर आरामात टिकेल.

# शेतात जाण्याच्या रस्त्यावर अतिक्रमण झालंय यासाठी कुठे कराल अर्ज?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अचलपूर**

शेतकऱ्यांसाठी आपल्या शेतात जाण्यासाठी, येण्यासाठी शेत रस्ता, पाणंद रस्ते, गाडी मार्ग, पाऊल रस्ते अत्यंत महत्त्वाचे असतात. शेतीमध्ये पेरणी, पाळी, नांगरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी अशी कामे यंत्रामार्फत केली जातात.

शेतीमाल बाजारात पोहोचविण्यासाठी, यंत्रसामग्री शेतीपर्यंत पोहोचण्यासाठी शेतीला सर्व ऋतूत व बारमाही शेत रस्त्यांची आवश्यकता असते. शेत रस्ते, शिव रस्ते, पाणंद रस्ते व पाऊल रस्ते प्रामुख्याने शेतीमधील कामाकरिता उपयोगात येतात.

हे सर्व रस्ते सुयोग्य आणि व्यवस्थित असणे आवश्यक आणि गरजेचे आहे. परंतु, असे रस्ते पावसाळ्यात चिखल-पाण्यामुळे तर काही वेळा शेजारच्या शेतकऱ्यांनी केलेल्या अतिक्रमणामुळे निरुपयोगी ठरतात.

शेत रस्ते, पाणंद रस्ते, गाडी मार्ग, शिव रस्ते आणि पाऊल रस्त्यांच्या हक्काबाबत शेतकऱ्यांमध्ये वाद-विवाद निर्माण झाल्यास त्याबाबत चौकशी करून योग्य तो आदेश आणि निर्णय देण्याचे अधिकार महाराष्ट्रातील विविध कायद्यांद्वारे सरकारी यंत्रणेस प्राप्त होतात.

महसूल विभागाचा अभ्यास असणारे अजिंक्य कदम म्हणाले, महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९६६ मधील कलम १४३ अन्वये तहसीलदारांना कायदेशीर




अधिकार आहेत.

अशा शेतावर जाण्याच्या मार्गाचे हक्काबाबत वाद निर्माण झाल्यास तहसीलदार यांच्याकडे अर्ज करून दाद मागता येते. वहिवाटीच्या रस्त्यांची अडवणूक केली असल्यास मामलेदार न्यायालय कायदा १९०६ चे कलम ५ अन्वये तहसीलदारांना हा रस्ता मोकळा करून देण्याचे अधिकार आहेत.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026



# अमरावती जिल्हयात अनेकांच्या तलवारी म्यान...पण सात बंडखोर मात्र रिंगणात कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती :**

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी अनेक बंडखोरांनी आपल्या तलवारी म्यान केल्या. परंतु, बडनेरा, अमरावती, अचलपूर, दर्यापूर, मोर्शी मतदारसंघांमधील सात बंडखोर निवडणुकीच्या रणांगणात कायम आहेत.

जिल्ह्यातील बंडखोर उमेदवारांची समजूत काढण्याचे मोठे आव्हान महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांसमोर होते. वरिष्ठ नेत्यांनी पक्षाच्या बंडखोर उमेदवारांना शांत करण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न केला. यात काही ठिकाणी यश आले, पण अनेक उमेदवार बंडखोरीच्या निर्णयावर ठाम राहिले. अचलपूर मतदारसंघातून भाजपचे बंडखोर उमेदवार नंदकिशोर वासनकर, अक्षरा लहाने यांच्यासह ८ जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले, त्यामुळे आता या ठिकाणी २२ उमेदवार रिंगणात आहेत. तरीही भाजपसमोरील संकट पूर्णपणे टळू शकले नाही. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष आणि बंडखोर उमेदवार ठाकूर प्रमोदसिंह गड्रेल यांनी लढत देण्याचा निर्णय घेतला आहे.

मेळघाटमधील भाजपचे बंडखोर उमेदवार माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांच्यासह ९ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत. मात्र भाजपच्या अन्य बंडखोर उमेदवार ज्योती सोळंके




यांनी माघार न घेतल्याने भाजपसमोरील अडचणी कायम आहेत. काँग्रेसचे बंडखोर उमेदवार मन्ना दारसिंबे यांनी उमेदवारी मागे घेतल्याने महाविकास आघाडीला दिलासा मिळाला आहे.

अमरावतीत ७ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. मात्र भाजपचे बंडखोर उमेदवार माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता हे लढतीत कायम आहेत. बडनेरा मतदार संघात महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांमध्ये बंडखोरी झाली आहे. युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा यांच्या विरोधात भाजपचे बंडखोर तुषार भारतीय आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उमेदवार सुनील खराटे यांच्या विरोधात प्रीती बंड लढतीत कायम आहेत. दर्यापूरमध्ये महायुतीतील फूट कायम आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात भाजपचे बंडखोर आमदार रमेश बुंदिले युवा स्वाभिमान पक्षातर्फे लढत आहेत. काँग्रेसचे बंडखोर उमेदवार गुणवंत देवपारे, रामेश्वर अभ्यंकर यांनी माघार घेतल्याने महाविकास आघाडीला दिलासा मिळाला आहे.मोर्शीतून भाजपचे बंडखोर उमेदवार डॉ. मनोहर आंडे, राजेंद्र आंडे, श्रीधर सोलव, अमित कुबडे यांनी माघार घेतली आहे, मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) बंडखोर विक्रम ठाकरे रिंगणात आहेत. जिल्ह्यात एकूण २४८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते, त्यापैकी ८८ जणांनी माघार घेतल्याने १६० उमेदवार लढतीत कायम आहेत.

# निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे

## निवडणूक निरीक्षक श्यामलाल पुनिया



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती–**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली आहे. उमेदवारांना चिन्ह वाटप झाल्यानंतर आता प्रचार सुरू होणार आहे. उमेदवारांनी निवडणूक कालावधीत प्रचार करताना आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन अमरावती विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक श्यामलाल पुनिया यांनी केले.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने उमेदवारांची बैठक नवीन तहसिल कार्यालयात घेण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांच्यासह अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

श्री. पुनिया यांनी, निवडणूक लढवित असलेल्या उमेदवारांना मार्गदर्शन केले. चिन्ह वाटप करण्यात आल्यानंतर उमेदवारांना प्रचार करावा लागणार आहे. मात्र प्रचार करताना सर्व परवानगी घेऊन करावा. यासाठी मार्गदर्शक पुस्तिकाही देण्यात येणार आहे. उमेदवार अंतिम झाल्यानंतर प्रत्यक्ष मतपत्रिका कशी राहणार आहे, याचाही नमुना देण्यात येणार आहे. निवडणूक पारदर्शी पद्धतीने होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन केले. निवडणुकीमध्ये प्रतिनिधी नेमताना त्यांना योग्य माहिती देण्यात यावी. त्यामुळे चुकीची माहितीवर प्रतिबंध घातल्या जाईल.

निवडणुकीत ५० टक्के मतदान केंद्रांचे लाईव्ह टेलिकास्ट करण्यात येणार आहे. तसेच गृहमतदानाच्या प्रक्रियेमध्ये सर्व उमेदवारांनी उपस्थिती दर्शवावी. अमरावतीच्या निवडणुकीत २२ उमेदवार असल्याने दोन मतदान यंत्र राहणार आहे. मतदान प्रक्रियेबाबत उमेदवारांना वेळोवेळी सर्व माहिती उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. उमेदवारांना निवडणुकीसाठ ४० लाख रूपयांची मर्यादा असून या मर्यादेत खर्च करावा लागणार आहे. निवडणूकीत होणारा खर्च पथकास सादर करावा. तसेच मतदारांना कोणतेही प्रलोभने देण्यात येऊ नये. मतदारांनी मतदानासाठी पुढाकार घ्यावा, यासाठी उमेदवारांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

यावेळी उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या शंकाचे निरासन करण्यात आले. तसेच खर्च विषयक बाबींची माहिती देण्यासाठी व्यक्तिशः मदत करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# बडनेरात धडाडणार उद्धव ठाकरेंची तोफ

## मविआ उमेदवार सुनील खराटे यांच्या प्रचारार्थ ७ नोव्हेंबर रोजी विशाल जाहीर सभा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती–** महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख आणि महाराष्ट्राची मुलुख मैदानी तोफ उद्धव ठाकरे यांची ७ नोव्हेंबर रोजी जुनी वस्ती बडनेरा येथील आठवडी बाजारात विशाल जाहीर सभा होणार आहे. या सभेच्या माध्यमातून उद्धव ठाकरे हे विदर्भातील प्रचाराचा शुभारंभ करणार असून जाहीर सभेच्या निमित्याने विशेष करून शिवसैनिकांमध्ये कमालीचा उत्साह संचारला आहे.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ ७ व ८ रोजी पश्चिम विदर्भाच्या दौऱ्यावर येत असून ७ नोव्हेंबर रोजी ते दर्यापूर मतदारसंघात रोड



शो करून वलगाव येथे आयोजित सभेला संबोधित करतील, त्यानंतर बडनेरा मतदार संघातील महा विकास आघाडी व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अधिकृत उमेदवार सुनील खराटे यांच्या प्रचारार्थ बडनेरा जुनीवस्ती आठवडी बाजार प्रांगणात आयोजित जाहीर सभेला ते संबोधित करणार आहे. या सभेत उद्धव ठाकरे यांची तोफ धडाडणार असून ते जाहीर सभेतून कोणाला लक्ष करतात आणि कुणाचा समाचार घेतात याकडे संपूर्ण जिल्हावाशीयांचे लक्ष लागले आहे तसेच ते सुनील खराटे यांना निवडून देण्यासाठी मतदारांना साद घालणार आहे.उद्धव ठाकरे यांच्या सभेच्या निमित्ताने शिवसैनिकांमध्ये कमालीचा उत्साह संचारला असून सभेची जोरदार तयारी करण्यात येत आहे. ही सभा यशस्वी करण्यासाठी शिवसेनेची एक मोठी जम्मू प्रयत्नशील असून सभेच्या नियोजनाची ते आखणी करीत आहे. उद्धव ठाकरे यांच्या जाहीर सभेला सर्वसामान्य मतदार ,शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, समाजवादी पार्टी ,आप व अन्य घटक पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महाविकास आघाडीचे उमेदवार सुनील खराटे यांनी एका प्रसिद्धी पत्रकारद्वारे केले आहे.

# मतदारांना मतदार स्लिप मिळणार

## जिल्हा स्वीप नोडल अधिकारी संजीता महापात्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती–**

अमरावती जिल्हातील ८ विधानसभेची निवडणूक येत्या २०नोव्हेंबरला होत आहे.या करीता १००%मतदारांना मतदार स्लिप देण्यात येणार आहे.प्रत्येक गावात बीएलओ मार्फत व्होटर स्लिपचे वाटप होणार आहे. अशी माहीती जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी दिली आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता अमरावती



जिल्हयातील सर्व केंद्रावर किमान आवश्यक सुविधा (–चक्र) आणि १००% मतदारांना मतदार चिठ्ठी (तखड) वाटप करण्याबाबतचे निवडणूक आयोगाचे निर्देश आहेत. त्या अनुषंगाने अमरावती ग्रामीण कार्यक्षेत्रात प्रत्येक मतदार केंद्रांवर किमान आवश्यक सुविधा (–चक्र) असल्याची आणि १००% मतदारांना मतदार चिठ्ठी (तखड) वाटप झाल्याची खात्री करण्यासाठी खालील अधिकारी–कर्मचारी यांची जिल्हा परिषद स्तरावर समन्वयासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. या करीता अमरावती जि.प.माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख,प्राथमिक शिक्षणाधिकारी बुध्दभूषण सोनोने,गजानन पाचपोर,सहा.अति.मुकाअ यांची नेमणूक करण्यात आली आहे. अधिकारी यांनी अमरावती जिल्हयातील आठही मतदारसंघातील प्रत्येक मतदान केंद्र निहाय किमान आवश्यक सुविधा (-MF) आहेत याबाबतची खात्री संबंधित तालुक्यातील संस्था प्रमुखांकडून/शाळा मुख्याध्यापक यांचेकडून करुन घ्यावी. जिल्हा परिषद अतंर्गत ज्या इमारतीच्या ठिकाणी सुविधा आवश्यक आहे त्याबाबतची त्वरीत कार्यवाही जि.प. विभाग प्रमुख यांचेकडे व्यक्तिशः पाठपुरावा करुन करुन घ्यावी.

सर्व ठिकाणी किमान सुविधा उपलब्ध आहे याबाबतचे लेखी प्रमाणपत्र तालुका अधिकारी (BDO/BEO) यांचेकडून प्राप्त करुन घ्यावे. मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी प्रत्येक मतदारांपर्यत मतदार चिठ्ठी (VIS) वाटप होणे आवश्यक आहे. आपलेस्तरावर इडज यांचेकडून नियमितपणे आढावा घ्यावा. इडज यांचेकडून प्रत्येक मतदारांपर्यंत चिठ्ठी वाटप होत होईल याबाबत तक्रार प्राप्त होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी व तसे नियोजन करावे. तसेच दिनांक ६ नोव्हेंबर रोजी आयोजित बैठकीकरीता आपण उपस्थित राहावे.असे आदेश जिल्हा स्लीप कक्षाच्या नोडल अधिकारी संजीता महापात्र यांनी दिल्या आहे.

# अमरावती रेल्वे स्थानकाचा मध्य रेल्वेच्या सुंदर स्थानकांत समावेश

## मध्य रेल्वे सौंदर्य वाढवण्यासाठी आणखी निधी देणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती–** मध्य रेल्वेच्या सुंदर रेल्वे स्थानकामध्ये अमरावती मॉडेल रेल्वे स्थानकाचा समावेश असून या स्थानकाचे सौंदर्य आणखी वाढावे यासाठी अमृत दोन योजनेंतर्गत मध्य रेल्वे आणखी सुमारे २७ कोटी रु. खर्च करणार आहे. बाहेरून हे रेल्वे स्थानक एखाद्या महालाची प्रतिकृती वाटते. त्याचप्रमाणे प्लॅटफॉर्मवर जाण्यासाठी भुयारी मार्ग असलेले हे देशातील मोजक्या रेल्वे स्थानकांपैकी एक आहे.

विशेष बाब अशी की, कार्यालयीन कामासाठी या रेल्वे स्थानकावर पूर्णत: सौर ऊर्जेचा वापर केला जात आहे. दोन्ही द्वारांमध्ये तिकीट काऊंटर, चार प्लॅटफॉर्म या स्थानकावर आहेत. अमरावती रेल्वे स्टेशन हे हावडा–नागपूर–मुंबई मार्गावरील बडनेरा रेल्वे स्थानकाशी जोडलेले आहे. हे टर्मिनल स्टेशन आहे. मुंबई, पुणे, तिरुपती, जबलपूर, सुरत, नागपूरसाठी गाडी अमरावतीहून निघते. हे अमरावती शहरातील तीन रेल्वे स्थानकांपैकी मुख्य स्थानक आहे. राज्य व देशातील काही महानगरांसोबत जोडलेले असल्यामुळेच अमरावती मॉडेल रेल्वे



स्थानकावर विविध आधुनिक सुविधा देण्याचा मध्य रेल्वेद्वारे प्रयत्न सुरू आहे.

प्लॅटफॉर्मवर जाण्यासाठी लिफ्टची सुविधा देण्यात आली असून लवकरच एस्केलेटरही येथे बसवले जाणार आहे. देशातील पहिली रेल्वे १६ एप्रिल १८५३ रोजी मुंबई ते ठाणे असा प्रवास करत होती. मे १८५४ पर्यंत, ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वेची बॉम्बे–ठाणे लाईन कल्याणपर्यंत वाढवण्यात आली. भुसावळ रेल्वे स्थानक १८६० मध्ये स्थापन करण्यात आले आणि १८६७ मध्ये जीआयपीआर शाखा नागपूरपर्यंत वाढवण्यात आली. १३८ किलोमीटर (८६ मैल)–लांब ५ फूट ६ इंच ब्रॉडगेज बडनेरा–नरखेड मार्ग २०१२ मध्ये पूर्ण झाला. नवी अमरावती अकोली रेल्वे स्टेशन याच ट्रॅकवर आहे. १९९३–९४ मध्ये अमरावती परिसरातील रेल्वेचे विद्युतीकरण करण्यात आले. २ किमी लांबीची अमरावती कॉर्ड लाइनचे २०११–१२ मध्ये विद्युतीकरण करण्यात आले.

अमरावती रेल्वे स्थानकावरील सुविधांमध्ये संगणकीकृत आरक्षण कार्यालय आणि प्रतिक्षालय आहे. अमरावती मॉडेल रेल्वे स्थानक. अमरावतीहून इतर शहरांसाठी सुटणाऱ्या रेल्वे गाड्या पुणे–अमरावती एसी सुपरफास्ट एक्स्प्रेस, अमरावती–पुणे दैनंदिन एक्सप्रेस, मुंबई सीएसएमटी–अमरावती, अंबा सुपरफास्ट एक्सप्रेस, तिरुपती–अमरावती एक्सप्रेस, सुरत–अमरावती एक्सप्रेस, अमरावती–अजनी इंटरसिटी एक्सप्रेस, अमरावती–जबलपूर सुपरफास्ट एक्सप्रेससह बडनेरा –अमरावती शटल, अमरावती– वर्धा पॅसेंजर, नागपूर –अमरावती पॅसेंजर या स्थानकावरून सुटते.

# मेळघाटच्या वारली पेंटिग्जची राष्ट्रपती यांनी केली प्रशंसाः

## कांडलीच्या सुमित्रा यांचा दिल्लीच्या राजभवनात मुक्काम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती–** वारली पेंटिग्ज् आणि व्याघ्र प्रकल्पातील जंगल तसेच वन्यजीव संपदेला चित्राच्या माध्यमातून समाजापुढे आणणाऱ्या सुमित्रा आहकेला तब्बल १५ दिवस राष्ट्रपतींच्या अतिथी म्हणून दिल्लीच्या राजभवनात राहण्याची संधी मिळाली. यादरम्यान त्यांच्या अंगी असलेल्या घरगुती कलेचा सन्मानही राष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात आला. मेळघाट येथील गौरखेडा कुंभी येथे मुख्यालय असलेल्या 'खोज' संस्थेत कार्यरत सुमित्रा आहके या आदिवासी भगीनी उच्चशिक्षित आहेत. रेखाकला हा विषय त्यांनी शालेय शिक्षणापासूनच जपला. त्यामुळे आदिवासी संस्कृतीची ओळख करुन देणारे वारली पेंटिग्ज्, जंगलातील राहणीमान, वाघाचे महत्व आदी बाबी त्यांच्या चित्रकलेतून नेहमीच समाजासमोर आल्या आहेत. आदिवासी मुला–मुलींना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात



आणण्यासाठी त्यांना प्रशिक्षित करणे, बडबड गीते व इतर कलांच्या माध्यमातून शिक्षणाविषयी आवड निर्माण करण्यासाठी मेळघाटातील धारणी व चिखलदरा या दोन्ही तालुक्यांतील खेडे व तांडे हे त्यांचे कार्यक्षेत्र आहे.

राष्ट्रपती भवनात अलिकडेच दहा दिवसीय आवासीय कला शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.विशेष असे की या खास निवडीतील १५ जणांमध्ये सुमित्रा आहकेला गुणवत्तेच्या श्रृंखलेत दुसरे स्थान प्राप्त झाले. त्यांनी तयार केलेले वारली पेटिंग्ज, गाव तसेच शहरातील फरक दर्शविणारे चित्र, देवस्वरुप मानला जाणारा वाघ आणि आदिवासी क्षेत्रातील लुप्त होत चाललेल्या कलाप्रकारांवर टाकलेला प्रकाश राष्ट्रपतींना खूप भावला. त्यामुळे निरोप समारंभावेळी सुमित्रा आहकेंना प्रमाणपत्र, चषक आणि भेटवस्तू देऊन सन्मानीत करण्यात आले. सुमित्रा आहके यांच्या यशामुळे अमरावती जिल्ह्याच्या सन्मानात मानाचा तुरा खोवला गेला असून या यशाबद्दल खोज संस्थेचे प्रमुख ड. बंड्या साने, सामाजिक कार्यकर्त्या ड. पूर्णीमा उपाध्याय, ब्रदर जोस आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# मध्य रेल्वेद्वारे आज दोन विशेष रेल्वे गाड्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** दिवाळी आटोपल्याने गृहनगरातून कामासाठी मुंबई, पुणे, नागपूर, अहमदाबाद या महानगरात परत जाण्यासाठी प्रवाशांची रेल्वेत चांगलीच गर्दी होत आहे. त्या अनुषंगाने मध्य रेल्वेद्वारे दररोज विशेष गाड्यांचे नियोजन करण्यात आले. याअंतर्गतच लोकमान्य टिळक टर्मिनस–संत्रागाच्छी सुपर फास्ट विशेष रेल्वेसह पुणे–नागपूर विशेष गाडीची सोय करण्यात आली आहे. ज्यांना मुंबई व पुण्याहून बडनेरा, अमरावती येथे परतायचे अशा प्रवाशांसाठी ही विशेष सुविधा आहे. ३० ऑक्टोबरपासून मध्य रेल्वे प्रवाशांच्या सुविधेसाठी दररोज विशेष रेल्वे गाड्या चालवत आहे. नियमित गाड्यांव्यतिरिक्त या – गाड्या आहेत. त्यामुळे या गाड्यांमुळे प्रवाशांना प्रवासाचे अतिरिक्त पर्याय मिळाले आहेत. १० नोव्हेंबरपर्यंत या विशेष गाड्या चालणार आहेत. त्यानंतर नियमित गाड्या आहेतच. जरी मध्य रेल्वेने अतिरिक्त विशेष गाड्या दिल्या तरी रेल्वेत प्रवाशांची गर्दी मात्र कायम आहे.

# विदर्भ प्रजासत्ताक कुरुक्षेत्र २०२४

३ मंगळवार दि. ५ नोव्हेंबर २०२४




## शहर विकासासोबतच पर्यावरण समतोल राखण्यासाठी प्रयत्नरत

### आ. सुलभा खोडके यांचे पदयात्रेदरम्यान प्रतिपादन



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५अमरावती–** शहराचा आर्थिक, औद्योगिक विकास करण्यासह पर्यावरणाचा समतोल राखणे याला आपले प्राधान्य असल्याचे आ. खोडके म्हणाल्या. आशीर्वाद पद यात्रेदरम्यान त्यांनी संवादातून नागरिकांचे हितसरंक्षणाची कटीबद्धता स्पष्ट केली.

अमरावती शहराचा पर्यावरण आणि पर्यावरणीयदृष्ट्या अधिक विकास साधायचा आहे. त्यामुळे हवा, जमीन आणि पाण्याची गुणवत्ता राखून विकास करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. नागरिकांसाठी चांगले जीवन सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे. अशा परिस्थितीत विकसित शहराच्या प्रवासात पर्यावरणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. अशी

क्चनबद्धता व्यक्त करत आ. सुलभा संजय खोडके स्थानिक नागरिकांसोबत संवाद साधला. यासोबतच घनकचरा व्यवस्थापन सुधारणे, कचरा निर्मूलन आणि शाश्वत जीवनाला चालना देण्यावर लक्ष केंद्रित करून शहरी भागाचा कायापालट करण्याच्या दिशेने आपण सातत्याने प्रयत्नशील राहू, असा विश्वास या वेळी आ. खोडके यांनी व्यक्त केला. अडीच वर्षात महायुती सरकारने बार्टी, सारथी, महाजोतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी अनेक योजना आणल्या आहेत. विद्यार्थ्यांना दिलासा देणे हेच आपले लक्ष्य असल्याचे त्यांनी सांगितले. ही यात्रा न्यू हनुमान नगर, गोपी कॉलोनी, राममोहन नगर, सुरभी विहार, श्रीकृष्ण नगर, मिलिंद कॉलनी यासह अन्यपरिसरात पोहोचली होती.

## मेळघाटात तिरंगी लढत; कोण बाजी मारतो याची उत्सुकता






विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५धारणी–**

नाट्यमय राजकीय घाडामोडींमुळे चर्चेत राहिलेल्या – मेळघाट मतदारसंघात आता तिरंगी लढत निश्चित झाली आहे. भाजपचे – बंडखोर प्रभुदास भिलावेकर यांनी – ऐनवेळी पक्षश्रेष्ठींच्या सूचनांचा आदर – करत तलवार म्यान केल्याने महायुतीचे – केवलराम काळे यांची डोकेदुखी कमी झाली आहे. त्यामुळे आता काळे, प्रहारचे उमेदवार विद्यमान आ.राजकुमार पटेल व काँग्रेसचे नव्या दमाचे उमेदवार डॉ. हेमंत चिमोटे यांच्यात तिरंगी लढत होणार आहे. राजकुमार पटेल व केवलराम काळे यांच्यात याआधी लढत झाली असून, काँग्रेसचे . हेमंत चिमोटे हे नवे आहेत. त्यामुळे त्यांच्यापुढे मतदारांना आपल्याकडे वळवण्याचे मोठे आव्हान आहे. त्या तुलनेत पटेल व काळे हे प्रस्थापित उमेदवार आहेत. यादोघांना मेळघाटातील एकूणच राजकीय स्थितीची माहिती तसेच मतदारांची जाण असल्याने त्याचा ते खुबीने वापर करतील, यात दुमत नाही. त्याचवेळी नवे असले तरी डॉ. चिमोटे यांच्याकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यांचीही वेगळी व्होट बँक आहे. अशात तिघांपैकी कोणता उमेदवार मतदारांच्या पचनी पडतो त्यावरच त्यांचे भवितव्य अवलंबून आहे.

## मोर्शी मतदारसंघात महायुतीत फूट, तर मविआत बंड






विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५मोर्शी –** मोर्शी, वरुड मतदारसंघात महायुतीमधील मित्र पक्ष राष्ट्रवादीने (अजित पवार गट) विद्यमान आमदार देवेंद्र भुवार यांना तर महायुतीमधील प्रमुख पक्ष भाजपने उमेश यावलकर यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे महायुतीतील ददोन मित्रपक्ष या ठिकाणी एकमेकांचे विरोधक झाले आहेत. या ठिकाणी महायुतीत सरळ फूट पडल्याचे समोर आले आहे. दोन्ही पक्षाने दोन्ही उमेदवाराला आपापल्या पक्षाचे तिकीट दिल्यामुळे त्यांना अधिकृतपणे एकमेकांच्या विरोधात मते मागण्याची संधी मिळाली आहे. याचवेळी मविआकडून हा मतदारसंघ राष्ट्रवादीसाठी (शरद पवार गट) सोडण्यात आला. राष्ट्रवादीने गिरीश कराळे यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे मात्र काँग्रेसचे विक्रम ठाकरे व त्यांचा गट नाराज झाला होता. दरम्यान मविआचे नेते विक्रम ठाकरे यांची समजूत काढण्यात अयशस्वी ठरले आणि ठाकरे यांची उमेदवारी कायम आहे. त्यामुळे आता या ठिकाणी चौरंगी लढत होणार आहे. दरम्यान भाजपने मात्र पक्षातील नाराज झालेल्या मंडळींची मनधरणी केली आहे, त्यामुळे मोर्शीत भाजपला त्याचा फायदा होण्याची दाट शक्यता आहे.

## तिवसा मतदारसंघात मविआ विरुद्ध महायुती थेट सामना






**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५तिवसा**काँग्रेसच्या विद्यमान आमदार तथा माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्या विरुद्ध महायुतीने भाजपचे राजेश वानखडे यांना उमेदवारी दिली आहे. या मतदारसंघात आता थेट लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजपचे रविराज देशमुख यांनी मागील काही वर्षांपासून तिवसा मतदारसंघात भाजपकडून निवडणूक लढवण्यासाठी तयारी केली होती. परंतु २०१९ मध्ये हा मतदारसंघ युतीमध्ये शिवसेनेच्या वाट्यावर गेला होता. त्यावेळी शिवसेनेकडूनही राजेश वानखडे यांनाच उमेदवारी मिळाली होती. २०१९ मध्ये ॲड. ठाकूर यांनी वानखडेंचा पराभव

होता. दरम्यान यंदा मतदारसंघ महायुतीमध्ये भाजपला सुटला. परंतु भाजपने रविराज देशमुख यांना डावलून शिवसेनेतून भाजपत आलेले वानखडे यांना उमेदवारी दिली आहे. या प्रकारामुळे रविराज देशमुख नाराज झाले होते. त्यांनी शक्तिप्रदर्शन करून नामांकनही दाखल केले होते. मात्र रविराज देशमुख यांनी सोमवारी (दि. ४) अर्ज मागे घेतला. भाजपचे वरिष्ठ नेते त्यांची नाराजी दूर करण्यात यशस्वी ठरले. त्यामुळे आता तिवसा मतदारसंघात मविआ विरुद्ध महायुती अशी थेट लढत पाहायला मिळणारआहे.

## धामणगाव रेल्वेत तिहेरी लढत






विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५धामणगाव रेल्वे** धामणगाव रेल्वे मतदारसंघात महायुतीच विद्यमान आमदार प्रताप अडसड, मविआचे प्रा. वरिंद्र जगताप आणि वंचित बहुजन आघाडीचे डॉ. नीलेश विश्वकर्मा यांच्यात तिहेरी लढत आहे. धामणगाव रेल्वे मतदारसंघात धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे आणि नांदगाव खंडेश्वर या तीन तालुक्यामधील बहुतांश भाग येतो. त्यामुळे जो उमेदवार तिन्ही तालुक्यात समसमान प्रमाणात आपले वर्चस्व कायम ठेवण्यात यशस्वी होईल, त्यालाच यश मिळेल, हे आतापर्यंतचे समीकरण या मतदारसंघाच्या निकालात प्रामुख्याने समोर आले आहे. दरम्यान या मतदारसंघात मविआ किंवा महायुतीकडून कोणीही बंडाच्या भूमिकेत नव्हते, ही या मतदारसंघाची आतापर्यंतची विशेषतः ठरली आहे.

## अचलपुरात २२ उमेदवार रिंगणात, तिरंगी लढत




विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५परतवाडा–** अचलपूर विधानसभा मतदारसंघात ८ नामनिर्देशनपत्रे मागे घेण्यात आल्याने २२ उमेदवार रिंगणात उरले आहेत. यामध्ये विद्यमान आमदार बच्चू कडू चारवेळा विजयी होऊन पाचव्यांदा रिंगणात आहेत, तर काँग्रेसचे उमेदवार बबलू देशमुख तीनदा पराभूत होऊन चौथ्यांदा मैदानात उतरले आहेत. प्रवीण तायडे यांना नव्या चेहऱ्याच्या रुपात भाजपने उमेदवारी दिली आहे. वरवर पाहता या तिघांमध्येच लढत होईल, असे दिसते. मात्र भाजपचे प्रमोदसिंह गड्रेल यांनी बंडखोरी करतअपक्ष उमेदवारी कायम ठेवल्याने ते कुणाला धक्का देतात अन् कुणाला विजयाकडे नेतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल, असे राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. २०१९ च्या निवडणुकीत येथे १२ उमेदवार रिंगणात होते, तर या निवडणुकीत ही संख्या १० ने वाढून २२ वर पोहोचली आहे. गेल्या निवडणुकीत प्रामुख्याने बच्चू कडू, बबलू देशमुख, सुनीता फिस्के, अ. नाजीम, राजेंद्र गवई हे प्रमुख उमेदवार होते. त्यात बच्चू कडू यांनी ८१ हजार २५२ मते घेत बबलू देशमुखांचा ८ हजार ३९६ मतांनी पराभव केला होता.

## ज्येष्ठ मतदारांमध्ये पुरुषांपेक्षा ६ हजार महिला मतदार जास्त



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५अमरावती–**

अमरावती जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघात ७० वर्षांवरील मतदारांमध्ये पुरुषांच्या तुलनेत ६ हजार २४ स्त्री मतदार जास्त आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत ज्येष्ठ महिलांची मते निर्णायक राहण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यात ७० ते १२० हून अधिक या वयोगटात २ लाख २१ हजार ७१७ मतदार संख्या आहे. यामध्ये पुरुष १ लाख ७ हजार ८४६ व स्त्री मतदार १ लाख १३ हजार ८७० व इतर एक अशी मतदार संख्या आहे. यामध्ये पुरुषांच्या तुलनेत ६ हजार २४ स्त्री मतदार जास्त आहेत. मतदार यादीच्या पुनरीक्षण कार्यक्रमात केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याद्वारा गृहभेटी देण्यात आल्या. त्यामुळे मतदार नोंदणी वाढली व मतदार यादी अपडेट झाली. शिवाय स्वीप अभियानांतर्गत सण उत्सवाच्या काळात विविध उपक्रम राबवण्यात आले. यादरम्यान महिलांमध्ये मतदानाविषयी जनजागृती करण्यात आली होती.

## आजपासून प्रचारास शुरुवात

### अपक्षांनाही निवडणूक चिन्हः प्रचाराला येणार वेग



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५अमरावती** राष्ट्रीय, राज्य पातळीवरील मान्यताप्राप्त व नोंदणीकृत पक्षाच्या उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केल्यापासूनच प्रचार सुरू केला आहे. कारण, त्यांना निवडणुकीत पक्षाचे चिन्ह आधीच मिळाले आहे. परंतु, बंडखोर व अपक्ष उमेदवारांना सोमवारी निवडणूक चिन्हाचे वितरण करण्यात आले. त्यामुळे आता सर्वच मंगळवार, ५ नोव्हेंबरपासून प्रचार रथावर स्वार होऊन मतदार संघातील जागा न् जागा पिंजून काढतील, प्रचारासाठी केवळ १४ दिवसांचा वेळ शिल्लक आहे. १८ नोव्हेंबरला सायंकाळी ५ वाजता प्रचारतोफा थंडावणार आहे. त्याआधी मतदारांमध्ये आपली व चिन्हाची ओळख निर्माण करण्यासाठी अपक्ष व बंडखोरांना चांगलेच झटावे लागेल. त्या तुलनेत मान्यताप्राप्त पक्षाच्या नोंदणीकृत उमेदवारांचे काम सोपे आहे. ते कोणत्या पक्षाचे, त्यांचे निवडणूक चिन्ह कोणते याबाबत मतदारांना माहिती आहे. त्यामुळे ते सध्या आरामात आहेत.

तसेच अर्ज दाखल केल्यापासूनच त्यांनी मतदार संघातील विविध भागात प्रचार सभा, कार्यक्रम, जनसंपर्क, दिवाळीच्या शुभेच्छा देण्याची संधी सोडली नाही. त्यांना प्रचारासाठी एक महिन्याचा पूर्ण कालावधी मिळणार आहे. त्याचवेळी १४ दिवसांत प्रत्येक मतदारापर्यंत निवडणूक चिन्हासह पोहोचण्याचे आव्हान हे बंडखोर व अपक्षांपुढे आहे.

## बडनेरा मध्ये होणार चौरंगी लढत






विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५ अमरावती–** विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यापासून बडनेरा मतदारसंघाकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. सोमवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर या मतदारसंघात चौरंगी लढत रंगणार असे चित्र स्पष्ट झाले. दोन बंडखोर शिवसेना उबाठाच्या प्रीती बंड अन् भाजपचे तुषार भारतीय यांनी निवडणुकीच्या रिंगणात कायम राहण्याचा निर्णय घेतल्याने या मतदारसंघात चुरस निर्माण झाली. महायुतीचाच घटक पक्ष युवा स्वाभिमान पार्टीचे विद्यमान आ. रवी राणा व मविआतील उबाठाचे सुनील खराटे या दोन्ही अधिकृत उमेदवारांची दोन्ही बंडखोरांमुळे डोकेदुखी वाढली आहे. या लढतीत तीन उमेदवार याआधी बडनेरातून लढले असून, खराटे हे नवे उमेदवार आहेत. आ. राणा यांनी बंड व भारतीय या दोघांचाही याआधी येथे पराभव केला आहे. येथे विजयाची हॅट्रिक करणारे यंदा राणा चौथ्यांदा नशीब अजमाणार आहेत. त्याचवेळी बंड यांनी २०१९ मध्ये उबाठाच्या उमेदवार म्हणून आ. राणा यांना थेट लढत दिली होती. तत्पूर्वी २०१४ मध्ये भाजपचे उमेदवार म्हणून तुषार भारतीय राणांविरुद्ध झुंजले होते. त्यातही नव्या दमाच्या खराटे यांना तर चांगलाच जोर लावावा लागेल. ही त्यांची पहिलीच वेळ आहे. बंडखोरीमुळे येथे महायुती व मविआची मते विभागली जातील.

## निवडणूक खर्चाची होणार ३ वेळा पडताळणी

### सर्व मतदारसंघातील उमेदवारांसाठी ७, ११ आणि १५ नोव्हेंबर या तीन तारखा निश्चित



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५अमरावती–** खर्चविषयक निरीक्षक वेंकन्ना तेजावथ त्यामुळेच निरीक्षकांच्या माध्यमातूनविधानसभा असलेल्या सर्व निवडणुकीच्या रिंगणात उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची पडताळणी तब्बल ३ वेळा केली जाणार आहे. या श्रृंखलेतील पहिली पडताळणी ७ नोव्हेंबरला होणार आहे. निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार ७५, ११ व १५ नोव्हेंबरला उमेदवारांचा खर्च पडताळून पाहिला जाणार आहे. त्यासाठी प्रत्येक मतदारसंघात वेगवेगळ्या वेळांमध्ये बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. निवडणुकीसाठी शासनाने पाठवलेले आणि डॉ. उमा माहेश्वरी तसेच त्या-त्या मतदारसंघासाठी नेमलेले सामान्य निरीक्षक हे प्रत्येक मतदारसंघातील निवडणूक कार्यालयाला भेट देणार आहेत. त्यांच्या समक्षच ही पडताळणी केली जाईल. बरेचदा उमेदवारांनी प्रचार यंत्रणेवर केलेला खर्च एकतर लपवला जातो किंवा तो बाजारभावाच्या तुलनेत कमी दर्शवला जातो. त्यामुळे प्रत्यक्षात झालेला खर्च अधिक असतानाही उमेदवारांनी दर्शवलेला खर्च कमी दिसतो. हेच नंतर उमेदवारासाठी अडचणीची ठरते.

उमेदवारांच्या खर्चाची पडताळणी केली जात आहे. या क्रमात पहिली पडताळणी ७ नोव्हेंबरला, दुसरी पडताळणी ११ ला तर तिसरी पडताळणी १५ नोव्हेंबरला केली जाणार आहे. तशा सूचना सर्व उमेदवारांना देण्यात आल्या असून, सर्व आठही मतदारसंघाच्या निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यासाठीची तयारी केली आहे. सद्य:स्थितीत जिल्ह्यात २४६ उमेदवार असून, ४ नोव्हेंबरच्या माघारीअंती ही संख्या त्याहून कमी होणार आहे.



# प्राचीन मंदिरांच्या जीर्णोद्धारांसाठी बच्चू कडू यांचा यशस्वी पुढाकार

## कोट्यावधी रुपयांच्या निधीने मंदिरांना झळाळी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अचलपूर**

बच्चू कडू हे महाराष्ट्राच्या राजकारणातील अजब रसायन आहे.स्पष्टवक्तेपणा त्यांच्या वक्तृत्वशैलीतून नेहमीच झळकत असतो.सत्य बोलायला न घाबरणाऱ्या बच्चू कडू यांनी धर्मातील चुकीच्या गोष्टीचे कदापि समर्थन केले नाही मात्र धर्मासाठी आणि धर्माच्या विस्तारासाठी त्यांनी वेगवेगळ्या माध्यमातून आपले कार्य सदैव सुरू ठेवले. विरोधकांनी नेहमी त्यांना धर्माच्या मुद्द्यांवरून घेरण्याच्या प्रयत्न केला मात्र बच्चू कडू यांनी अचलपूर मतदार संघातील मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी शासनाच्या तिजोरीतून कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून या दिवाळीला मतदारसंघातील मंदिरांना झळाळी मिळाली याचे खरे श्रेय बच्चू कडू यांना द्यावे लागेल. देव देश आणि धर्म यासाठी विरोधक केवळ गोष्टी करतात मात्र देशाचा नागरिक म्हणून धर्माचा रक्षक समजून बच्चू कडू यांनी देवांची मंदिरे उजळवून टाकली.बच्चू कडू यांच्या कामाची पद्धत ही वेगळी असून त्यांचा लढा खऱ्या अर्थाने दिव्यांग, गोरगरीब, निराधार,शेतकरी बांधव यांच्यासाठी असून त्यांच्या आशीर्वादाने आपण निवडून आलो त्यामुळे त्यांच्या कामांना प्राधान्याने करावे लागते आणि त्यांचे कामे प्राधान्याने होतात म्हणून विरोधकांना हे सहन होत नाही. अचलपूर मतदार संघातील मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी शासनाकडून वेगवेगळ्यामाध्यमातून कोटी रुपये निधी उपलब्ध करून मंदिरांचा कायापालट करण्यात आला. अचलपूर विधानसभेत अनेक प्राचीन मंदिरे आहेत. त्या प्रत्येक मंदिराला इतिहास आहे. जवळपास १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून त्या सर्व मंदिरांचे जीर्णोद्धार करण्याचे काम बच्चू कडू यांनी केले आहे. बच्चू कडू हे जात-पात न मानणारे नेते आहेत मंदिर मस्जिद मध्ये फरक न समजून ते फक्त मानवतेच्या दृष्टीने सर्वांना पाहतात. बच्चू कडू यांचा झेंडा एकच तो म्हणजे तिरंगा आज एवढ्या मोठ्या प्रमाणात मंदिरांसाठी निधी उपलब्ध करून अचलपुरातील त्या सर्व भाविक भक्तांचे त्यांनी मने जिंकले आहे.अष्टमासिद्धी येथील प्रसिद्ध असलेली कापूर विहिरीच्या विकासाकरिता तब्बल पाच कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहे. अचलपूर येथील बारी समाज हनुमान व्यायाम आखाडा या कामाकरता २कोटी २२ लक्ष रुपये मंजूर करून दिले आहे.त्यासोबतच जवळपास अचलपुरातील २२ प्राचीन मंदिरांकरीता कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून देऊन तेथील खऱ्या अर्थाने विकास केला आहे. चार वेळा निवडून येऊन सुद्धा मतदार संघात त्यांच्याबद्दल तीळ मात्र ही नाराजी व्यक्त केल्या जात नाही आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे बच्चू कडू हे आरोग्य, शिक्षण रोजगार, शेतकरी बांधव, दिव्यांग बांधव यांच्यासाठी सदैव तत्पर असतात. महाराष्ट्राच्या विधानसभेत एकमेव नेता आहे जो शेतकऱ्यांची बाजू मांडतो मग ते सत्तेत जरी असले तरी सत्तेच्या विरुद्ध जाऊन ते शेतकऱ्यांची बाजू मांडतात. महाराष्ट्राचा वाघ दिल्लीला जाऊन भिडतो आमदार कडू यांच्या विकास कामाला भारावून आज विविध पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते प्रहार मध्ये मोठ्या प्रमाणात प्रवेश करीत आहे.

### जयस्तंभ चौकातील शिवतीर्थचा होणार कायापालट

परतवाडा येथील जयस्तंभ चौक येथे अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत राजे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आहे. परतवाडा येथील शिवप्रेमींचे ते शिवतीर्थ आहे. शिवतीर्थच्या विकासाकरीता आमदार बच्चू कडू यांनी आपल्या निधीतून तब्बल ६० लक्ष रुपये मंजूर करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या परिसरातील सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे.यामुळे परतवाड्याच्या लौकिकात भर पडणार एवढे मात्र नक्की.

## शहरातील कन्या शाळेचे मैदान अस्वच्छतेच्या विळख्यात

### मैदानावर थाटले जातात विविध व्यवसाय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ दर्यापूर**

दर्यापूर शहराच्या मध्यभागी असलेले कन्या शाळेचे मैदान. हे क्रीडा प्रेमींसाठी नव्हे तर विविध व्यवसाय करणाऱ्यांसाठी उपलब्ध असल्यासारखे दिसत आहे. आपल्या मर्जीप्रमाणे या मैदानाचा वापर नागरिकांकडून होत आहे इतरत्र सासलेला मुरूम रेती यामुळे मैदानाची जागा कमी होत जात आहे या मैदानावर अनेक क्रीडापटू तयार झाले .पूर्वी या मैदानाला विशेष महत्त्व प्राप्त होते क्रिकेट हॉलीबॉल फुटबॉल हे खेळ मोठ्या प्रमाणात खेळले जात होते. त्यामुळे या मैदानावर रेलचेल असायची. आता मात्र या मैदानावर पाण्याच्या डबके जागोजागी साचलेले जातात. काटेरी झुडपे गांजर गवत यांची वाढ मोठ्या प्रमाणात होत आहे. मैदानाच्या बाजूंनी व्यवसायिकांनी अतिक्रमण केले असून. त्यावर व्यावसायिक प्रतिष्ठानातील घाण व केरकचरा आणून टाकतात .त्या ठिकाणी उघड्यावर लघुशंका देखील केली जाते . परिसरात भाजीपाला विक्रेते फळ विक्रेते व किरकोळ स्वरूपाचे व्यवसाय करणारे. सर्व आपला टाकाऊ माल त्याठिकाणी उघड्यावर टाकत असल्याने. मैदानावर घाणीचे साम्राज्य निर्माण झाले . या मैदानाची पूर्णपणे दुर्दशा झाली आहे. या मैदानावर अनेक राष्ट्रीय नेत्यांच्या टोलेजंग सभा झाल्या होत्या. शहराच्या मध्यभागी असलेलं हे मैदान दर्यापूरची शान म्हणून ओळखले जाते.आनंद मेला साठी ही जागा दिल्याने संपूर्ण मैदानाची ऐशी तैशी होते . परंतु या मैदानाकडे आता संबंधित विभागाचे लक्ष नसल्याने. करोडो रुपयाची मालमत्ता ही कचऱ्याच्या विळख्यात सापडली आहे. तरी संबंधित विभागाने या मैदानाच्या देखभालीकडे व दुरुस्तीकडे लक्ष दिल्यास. हे मैदान नक्कीच क्रीडा प्रेमींसाठी व वयोवृद्धांसाठी उपयोगी पडणार. असे जणमाणसात व्यक्त होत आहे.

## बडनेरातील जुन्या वस्तीत सुनील खराटे यांची संवाद रॅली

### मतदार संघाचा कायापालट करण्यास कटिबद्ध : मतदारांना दिली ग्वाही; एकवेळ संधी देण्याचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

विधानसभा निवडणुकीच्या निकालामध्ये निर्णायक ठरणाऱ्या बडनेरा शहरातील जुनी वस्ती भागात महाविकास आघाडी व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार सुनील खराटे यांनी संवाद रॅली काढून मतदारांसोबत संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेत मतदारसंघाचा कायापालट करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. सोबतच मतदारसंघात परिवर्तन घडवित एकवेळ सेवेची संधी देण्याचे आवाहन देखील मतदारांना केले.बडनेरा शहरातील जुनी वस्ती परिसर हा राजकीय दृष्ट्या संवेदनशील असून प्रत्येक निवडणुकीमध्ये या परिसरातील मतदारांची भूमिका निर्णायक ठरत असते. अशा निर्णायक ठरणाऱ्या मतदारांसोबत संवाद साधण्यासाठी महाविकास आघाडी व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार सुनील खराटे यांनी संवाद रॅली काढून प्रत्यक्ष संवाद साधत मतदारांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत चर्चा केली. यावेळी सुनील खराटे यांनी प्रत्येक घरास भेट देत त्या परिवारातील सदस्यांची आस्थेने विचारपूस करीत आपली भूमिका त्यांच्या पुढ्यात ठेवली.मतदार संघाच्या व आपल्या परिसराच्या विकासासाठी आता बदल हवा असून आपण परिवर्तन घडवून मला एक वेळ सेवेची संधी द्या असे आवाहन करीत आपल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही अशी हमी सुद्धा सुनील खराटे यांनी यावेळी मतदारांना दिली. सुनील खराटे यांच्या संवाद रॅलीमध्ये शेकडो मुस्लिम समाज बांधव सहभागी झाले होते. यावेळी मुस्लिम समाज बांधवांनी सुनील खराटे यांना पाठीशी खंबीरपणे उभे राहत साथ देण्याची हमी देत यावेळी कुठल्याही परिस्थितीत बदल हवाच यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचा निर्णय घेतला. तब्बल चार तास चाललेल्या या संवाद रॅलीचां प्रारंभ जुनी वस्ती बडनेरा येथील अलमास गेट येथून झाला त्यानंतर नूर नगर खाटीकपुरा या परिसरातून रॅलीने मार्गक्रमण केले. या रॅलीत माजी नगरसेवक साबीर भाई ,इमरान खान, वहीद खान ,राजा खान, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी किशोर बोरकर ,संजय बोबडे ,राष्ट्रवादी काँग्रेसचे विनेश आडतीया, शिवसेनेचे पदाधिकारी प्रकाश बांते ,सुखलाल गायकवाड यांच्यासह शेकडो कार्यकर्ते व पदाधिकारी सहभागी झाले होते.

## सुधारित पैसेवारीत ५,६६८ गावांवर अन्यायाची भावना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती :**

सततचा पाऊस व अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले. त्यात परतीच्या पावसाने झालेल्या नुकसानीची भर पडली. अशा परिस्थितीत अशा परिस्थितीत १,५९४ गावात ५० पैशाचे आत सुधारित पैसेवारी विभागीय आयुक्तांद्वारा सोमवारी जाहीर केली. शिवाय ५,६६८ गावात ५० पैशापेक्षा जास्त पैसेवारी दर्शविण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये अन्याय झाल्याची भावना आहे.

पश्चिम विदर्भात जून अखेरपासून सुरू झालेला सततचा पाऊस, अतिवृष्टीमुळे मूग, उडदाचे मोठे नुकसान झाले. तूर, कपाशी, सोयाबीनची वाढ खुंटली, पीक पिवळे पडले, कीड व रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने पिकांची सरासरी उत्पादकता कमी आलेली आहे. सोयाबीनचे पीककापणी होत आहेत. त्यामध्ये उतारा कमी येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अमरावती विभागात सुधारित पैसेवारी ५० पैशांच्या आत राहणार असल्याची अपेक्षा शेतकऱ्यांना होती. प्रत्यक्षात फक्त अकोला जिल्ह्यातील ९०० गावांमध्ये ४७ पैसेवारी जाहीर करण्यात आली.

**सुधारित पैसेवारीची जिल्हानिहाय स्थिती**

अमरावती जिल्ह्यात २०१३ गावांमध्ये ५६, यवतमाळ जिल्ह्यात २,०४६ गावात ५४, अकोला जिल्ह्यात ९९० गावांत ४७, बुलडाणा जिल्ह्यात ४८२ गावात ५० चे आत व ९३८ गावांमध्ये ५६, वाशिम जिल्ह्यात १२२ गावांमध्ये ५० चे आत व ६७१ गावांमध्ये ५५ सुधारित पैसेवारी जाहीर करण्यात आल्याने अंतिम पैसेवारीकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## १८ नोव्हेंबरपासून पडणार अक्षता: इच्छुकांची सुरू झाली लगबगयंदा ५२ मुहूर्त; लग्नाचे बार उडण्यास होतेय सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

तुलसी विवाह आटोपताच यंदा १८ नोव्हेंबरपासून लग्नाचे बार उडणार आहेत. पुढील आठ महिन्यांत ५२ मुहूर्त आहेत. यातील तब्बल २१ मुहूर्त फक्त फेब्रुवारी आणि मे या दोन महिन्यांत आहेत.

लग्न इच्छुकांच्या डोक्यावर यंदा नोव्हेंबरपासूनच अक्षता पडण्यास प्रारंभ होणार आहे. लग्न जुळलेल्यांच्या कुटुंबीयांनी आतापासून मंगल कार्यालये आरक्षित करण्यास सुरुवात केली आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा लग्नसराईचा कालावधी आठ महिन्यांचा आहे. त्या अनुषंगाने इच्छुकांची तयारी सुरू झाली आहे.

बुकिंग फुल्लविवाह सोहळा हा दोन कुटुंबांतील महत्त्वाचा आनंद सोहळा असतो. यासाठी प्रशस्त मंगल कार्यालय,पार्किंग व्यवस्था असलेल्या ठिकाणांना अधिक पसंती दिली जाते. धावपळ टाळण्यासाठी बुकिंगला सुरुवात झालीआहे. तर नवतरुण, तरुणींचे लग्नासाठी पाहणी कार्यक्रम करण्यास वेग आले असल्याचे दिसून येत आहे.मे महिन्यातील मुहूर्ताला पसंती मे महिन्यात शाळा-महाविद्यालयांना सुटी असल्यामुळे या दिवसातील मुहूर्त साधण्यात येतात. गेल्या मे महिन्यात नेमके मुहूर्त नव्हते. मात्र, यंदा नवीन वर्षात मे महिन्यात मुहूर्त अधिक असल्याने सर्वाधिक लग्न मे महिन्यातच होण्याची शक्यता आहे,



### असे आहेत विवाहयोग्य मुहूर्त

नोव्हेंबर १८, २२, २५, २७
डिसेंबर १, २, ५, ६, १९
जानेवारी १६, १९, २०, २३, २४, २९, ३०
फेब्रुवारी- २, ३, ७, १६, १९, २०, २१, २३, २६
मार्च- २, ३, ६, ७
एप्रिल १६, १८, २०, २१, २३, २५, ३०
मे १, ७, ८, ९, ११, १८, १९, २२, २३, २५, २८ सर्वो
जून- १, २, ३, ४

### फेब्रुवारी व मे मध्ये सर्वाधिक मुहूर्त

नोव्हेंबर ते जून या आठ महिन्यांच्या काळात एकूण ५२ मुहूर्त आहेत. पैकी फेब्रुवारीमध्ये १० मे महिन्यात ११ मिळून एकूण २१, असे मुहूर्त आहेत. सर्वांत कमी मुहूर्त डिसेंबर, मार्च वः व जून महिन्यात आहेत.



# विधानसभेतून स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी इच्छुकांची फिल्डिंग

## गट-गणांमधून प्रचार सुरुः सांभाळत आहे उमेदवारांची प्रचाराची धुरा

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

विधानसभा निवडणुकीमुळे सर्व पक्षांच्या हालचाली गतिमान झाल्या आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घोषित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिका, नगरपालिकांसह जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी इच्छुकदेखील प्रचाराच्या निमित्ताने कामाला लागले आहेत. विधानसभा निवडणुकीनिमित्ताने अनेकांनी जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीत आपली उमेदवारी निश्चित करण्यासाठीही फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली. निवडणुकीत पालिकेचे माजी नगरसेवक, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे माजी सदस्य, पदाधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. त्या अनुषंगाने पक्ष कामाला लागले असून, भेटीगाठीसह जमिनीस्तरावर जाळे मजबूत करण्यासाठी प्रयत्नात असल्याचे दिसून येत आहे. दोन वर्षांपूर्वी निवडणुका घेण्याच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. त्यासाठी प्रारूप आराखडाही प्रसिद्ध झाला होता. मात्र, पुन्हा एकदा खो बसला, या ना त्या कारणाने निवडणुका पुढे ढकलल्या. आता विधानसभा निवडणुकानंतर स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकाही होण्याची प्रतीक्षा आहे. जिल्हा परिषद, पंचायत समित्यांतील इच्छुकांनीही सक्रिय सहभाग घेण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी आपल्या प्रभाग, गटगणांमध्ये संपर्क वाढवण्यास सुरुवात केली आहे. विधानसभा निवडणुकीत कोणाला कसा कौल जातो, त्यातूनच अनेकांची राजकीय दिशाही त्यानिमित्ताने निश्चित होणार आहे.




### गट-गणांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका

जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील पदाधिकारी आता बैठकांवरभर देऊ लागले आहेत. गट गणांमधील हे पदाधिकारी विधानसभा निवडणुकीत महत्वाची भूमिका निभावणार असल्याने त्यांचे महत्वही याढले आहे. अनेकांनी जिल्हा परिषद, पंचायत परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीत आपली उमेदवारी निश्चित करण्यासाठीही फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे.

# निवडणूक ड्युटीमुळे अनेकांचे वाढले टेन्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**



जिल्ह्यातील विधानसभा निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. कर्मचाऱ्यांचे पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण सुद्धा झाले. मात्र निवडणुकीत ड्युटी लागलेल्या काही कर्मचाऱ्यांना निवडणुकीची ड्यूटी करायची नसल्यामुळे निवडणूक ड्युटी नको रे बाबा! म्हणत आजाराची कारणे सांगून ड्युटी रद्द करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे निवडणूक अधिकाऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. निवडणूक काळात सरकारी कर्मचारी, अधिकारी तसेच शिक्षकांनाही जबाबदारी दिली जाते. यावेळी काही बँक कर्मचाऱ्यांचीही ड्युटी लावण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी मतदान, मतमोजणी आणि पूर्व प्रशिक्षणासाठी त्यांची ड्युटी लावली जाते. मात्र निवडणूक ड्युटी टाळण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून नानाविध शक्कल लढविण्यात येते. यात उच्च रक्तदाब, मधुमेह, हाडांचे आजार, पोटाचे विकार, अपघाताने अपंगत्व, जन्मजात दिव्यांग अशी विविध आरोग्याची कारणे देऊन निवडणूक ड्युटी करण्यास नकार दिला आहे. मात्र जिल्ह्यात एकाच टप्प्यात विधानसभेची निवडणूक असल्याने कर्मचाऱ्यांची अधिक गरज आहे.

### अनेकांचा खटाटोप

निवडणुकीच्या कामासाठी एक दिवस आधीच जावे लागते. निवडणुकीचेजोखमीचे काम असते. ड्युटी रद्द करण्यासाठी अनेकांनी अर्ज केले आहेत. यातील वास्तव जाणून घेण्यासाठी त्यांना शासकीय रुग्णालयातून आजाराची गंभीरता दर्शविणाऱ्या प्रमाणपत्राची पूर्तता करण्याबाबत सांगितले जात आहे. यामुळे खरे रुग्ण आणि ड्युटीटाळण्यासाठी केलेला खटाटोप याबाबी स्पष्ट होणार आहेत.

# शेतमजूर,झोपडपट्ट्या, ठिय्यावरील मजुरांना आले 'अच्छे दिन'

## प्रचारफेऱ्या, सभांच्या गर्दीसाठी १५ दिवस रोजगार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

आज मंगळवार पासून सर्वच अधिकृत उमेदवार त्याचबरोबर बंडावर ठाम असलेल्या बंडखोरांचा प्रचार सुरू होणार आहे. उमेदवारांच्या पुढील १५ दिवसांतील प्रचारफेऱ्या, बड्या नेत्यांच्या सभांची हवा निर्माण करण्यासाठी गर्दी जमवावी लागणार आहे. कार्यकर्त्यांच्या माध्यमातून गर्दी जमवणे शक्य नाही. यामुळे झोपडपट्ट्या, ठिय्यावरील मजुरांना मजुरी देऊन आणावे लागणार असल्याने पुढील १५ दिवस झोपडपट्ट्या, ठिय्यावरील मजुरांना अच्छे दिन आले आहेत.

सभा व प्रचारफेऱ्यांना गर्दी जमविण्यासाठी मजुरांना मजुरी देऊन आणण्याचा प्रघात आता प्रत्येकच निवडणुकीत दिसून येतो. झोपडपट्ट्या, ठिय्यावरील माणसांना मजुरी देऊन जेवण-खाण्याचा बंदोबस्त केला जाईल. यासाठी कॅटरर्सवाल्यांनाही पुढील किमान १५ दिवस काम मिळणार आहे.

निवडणुकीकरिता अर्ज दाखल करताना काही उमेदवारांनी मोठ्या मिरवणुका काढून शक्तिप्रदर्शन केले. काही उमेदवारांच्या रॅलीत मजुरांना रोजी देऊन आणण्यात आले होते. मागील काही वर्षांत सभा, प्रभातफेऱ्यांना कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित राहतीलच याची शाश्वती नाही.

### गर्दी न जमल्यास हवा नसल्याचे नॅरेटिव्ह

सोशल मीडियावर कुठल्या उमेदवाराच्या रॅली, सभेत किती खुर्चा रिकाम्या होत्या, तुरळक गर्दी होती, याचे व्हिडीओ, रील्स सोशल मीडियावर व्हायरल होतात. त्यामुळे अमुक एक उमेदवाराची हवा नाही, असे नॅरेटिव्ह पसरवले जाते. यामुळे सभा, रॅलीसाठी गर्दी जमवावी लागते.


### माणसी ५०० ते ६०० रुपये

रॅलीत किती काळ सहभागी होणार यानुसार पैसे दिले जातात. किती तास सहभागी होणार यानुसार नाश्ता, जेवणाची सोय केली जाते. वाढती महागाई विचारात घेता रॅलीसाठी माणसी किमान ५०० ते ६०० रुपये मोजावे लागणार आहेत. मात्र, यात महिला-पुरुष, तरुण यांचे दर वेगवेगळे असून, यात रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांचा प्रामुख्याने समावेश राहणार आहे. बेरोजगार युवकांनाही यातून काही दिवस रोजगार मिळणार आहे.

# काळानुसार बदलतोय प्रचाराचा रंग अन् ढंग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ मोर्शी**

निवडणुकीच्या प्रचारावर निवडणूक आयोगाची करडी नजर असते. वापरलेल्या साहित्यानुसार खर्चाचा अंदाज घेतला जातो. उमेदवारांच्या खर्चावर मर्यादा असतात. साहजिकच उमेदवारांच्या प्रचार यंत्रणेवर बंधने आहेत. प्रचारात सोशल मीडियाचे महत्त्वाचे स्थान निर्माण झाले आहे. वाहनांचा ताफा कमी केला जात असला, तरी बुलेटची ठो-ठो, ओपन जीपवरून नमस्कार है प्रचारात टिकून आहेत. नवीन वाहनांची क्रेझ, सोशल मीडियाचे कॅमेरे, ड्रोन, लाइव्ह संच यांनी आपले वेगळे स्थान तयार केले आहे.




प्रचाराचा रंग बदलला, तसाउमेदवारांकडूनही भाषणाचा ढंग बदलला आहे. विकासाच्या मुद्यांऐवजी भाषणाचा बराचसा वेळ प्रतिस्पर्धी उमेदवारांचे उट्टे काढण्यात जातो.ताई, माई अक्का, विचार करा पक्का ही पूर्वीची कॅसेट मोर्शी तालुक्यातील मतदारांना पाठ झाली आहे. केवळ उमेदवाराचे नाव बदलते. चिन्हही तेच असायचे, ठरावीक पक्षाचे चिन्ह असल्याने त्यात खूपसा बदल नसे. प्रचारात विकासाचे मुद्दे असायचे,संबंधित भागाला काय हवे, हे मतदारांकडून जाणून घेतले जात. उमेदवार सर्वसामान्य मतदारांच्या घरात मत मागण्यासाठी जात. ज्येष्ठ व्यक्तींचे चरणस्पर्श करीत. मतदाराची याचना केली जात. आता यातील बहुतेक बाबी कालबाह्य झाल्या आहेत. राजकीय पक्षांची संख्या वाढली. चिन्हही वाढले. उमेदवार विकासाच्या मुद्यांपेक्षा प्रतिस्पर्धी उमेदवारांचा गैरव्यवहार वेशीला टांगण्याचा प्रयत्नकरतात. गावात काय हवे, हे ऐकून घेण्यास पुरेसा वेळ नसतो. असे असले तरी काही उमेदवार मात्र पोटतिडकीने एखाद्या प्रश्नाविषयी बोलतात. विद्यमान आमदार आपण केलेल्या कामांची जंत्री सांगतात. विरोधक मात्र त्या कामात कसा गैरव्यवहार झाला हे शोधतात. पण झालेले काम चांगले आहे, अशी म्हणण्याची तसदी कोणीही घेत नाही. प्रचारात भाषणासाठी, प्रचारफेरीत रोजंदारीवरील महिला, पुरुष आणण्याचा फंडा अनेकदा वापरलाजातो. भाषणात एखाद्या मुद्यावर नेता अनावश्यक भाष्य वापरतो. त्याला उपस्थित जोरदार टाळ्या पिटतात, प्रत्यक्षात तो मुद्दा कितपर्यंत आवडला, याबाबत ते अनभिज्ञ असतात. पूर्वीचे मतदार भाषणे कान देऊन ऐकत असत. आता मात्र नेता काय बोलतो, याकडे बहुतेकांचे लक्ष नसल्याने अनावश्यक वक्तव्यावर टाळ्या पडतात. कलर बॉक्सलाइव्ह सभा नको रे बाबा!नेत्यांच्या भाषणाचे लाइव्ह करण्याचे प्रकार गेल्या तीन-चार वर्षातील निवडणुकांमधून दिसून येत होते. आजही दिसतात. तथापि, काही वादग्रस्त वक्तव्याचा गैरफायदा विरोधक घेतात. त्यावरून ट्रोल केले जाते. त्यामुळे बहुतेक नेत्यांनी आता भाषणे लाइव्ह करणे बंद केले आहे.

# नियमांचे उल्लंघनः पण कारवाईकडे होतोय कानाडोळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

अमरावती शहरात खासगी ट्रॅव्हल्स चालकांकडून वाहतुकीच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होते. अनेक वेळा यातून अपघातही होतात. मात्र खासगी ट्रॅव्हल्स चालकांच्या मालकाचे प्रादेशिक परिवहन कार्यालयासोबत अर्थपूर्ण व्यवहार होत असल्याने सध्या तरी कोणतीही कारवाई होतांना दिसत नाही.

अमरावती शहरात वेलकम पॉईंट वर दररोज नियम डावलून सर्रास ट्रॅव्हल्समधून खासगी प्रवाशांची वाहतूक होत आहे. एसटी महामंडळाला पर्याय आणि समांतर व्यवस्था म्हणून खासगी ट्रॅव्हल्स वाढल्या आहेत. अनेक नागरिक खासगी ट्रॅव्हल्सने प्रवास करतात; मात्र काही ट्रॅव्हल्स चालकांकडून वाहतुकीच्या



नियमांचे उल्लंघन होत असताना कोणतीही कारवाई केली जात नाही. नियमित तपासणी, क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांची वाहतूक यासह वाहतुकीच्या इतर नियमांचे पालन होत नाही हे विशेष.

### शहर वाहतुकीला होतोय अडथळा


दररोज वेलकम पॉईंट वरून ट्रॅव्हल्स चालवल्या जातात. खासगी वाहतूक- दारांचा हा पॉइंट आहे. या ठिकाणाहून प्रवासी घेतले जातात. त्यामुळे साहजिकच रस्त्यावर प्रचंड गर्दी होते. याच छोट्या रस्त्यावरून ट्रॅव्हल्स वळवून घेतली जाते. अनेकवेळा विरुद्ध मार्गाने काही वाहनधारक गाड्या वळवतात. त्यामुळे अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.

पोलिस प्रशासनाने येथे स्वतंत्र पॉइंट तयार केला असला तरी केवळ दिखावा निर्माण करण्याचा प्रयत्न आहे.ट्रॅव्हल्स चालकांना शिस्त लावावी, अशी मागणी या परिसरातील नागरिक करीत आहे.

# तीर्थक्षेत्र वायगाव येथील गणपतीचे दर्शन घेऊन काँग्रेस उमेदवार यशोमती ठाकूर यांच्या प्रचाराला सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यास राज्यातील सर्व महिला सक्षम कशा होतील याकडे विशेष लक्ष दिले जाईल असे मत तिवसा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार आमदार यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केले.आज यशोमती ठाकूर यांनी श्रीक्षेत्र वायगाव येथील गणपतीचे दर्शन घेऊन आपल्या प्रचाराला सुरुवात केली त्यावेळी त्या



पत्रकारांशी बोलत होत्या.वाढती महागाई,प्रचंड बेरोजगारी,महिलां सुरक्षा आणि शेतकर्यांच्या कापूस सोयाबीन पिकाला कमी भाव इत्यादी समस्या कडे महायुतीच्या सरकारने पाठ फिरवली आहे...त्यामुळे जनतेमधे प्रचंड नाराजी आहे महायुतीचा पराभव निश्चित असून महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येणार असा विश्वास यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केला.काँग्रेस पार्टीच्या यशोमती ठाकूर ह्या तिवसा विधानसभा मतदारसंघात तीन टर्म आमदार असून चौथ्यांदा लढत आहे. त्यांचे विरुद्ध भाजपचे राजेश वानखडे निवडणुकीत रिंगणात आहेत.

# एकाच राज्यासाठी काम करत असाल तर तुम्ही पंतप्रधान कशाला होता? राज्याचे मुख्यमंत्री व्हा; पवार गरजले

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ५ पुणे**

विधानसभा निवडणुकांसाठी दिग्गजांच्या प्रचारतोफा आजपासून धडाडायला सुरुवात झाली असून महाविकास आघाडीच्या मोठ्या सभेचं नियोजन आजच करण्यात आलंय. तर, दुसरीकडे उद्धव ठाकरेंनी कोल्हापूरमधून रणशिंग फुकले आहे. तर, राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनीही बारामती मतदारसंघातून प्रचाराला सुरुवात केली. त्यानंतर, आज पुण्यातील एका सभेत बोलताना शरद पवारांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केवळ गुजरातच्याच विकासाचाच विचार करतात, गुजरातशिवाय त्यांना इतर राज्य दिसत नाहीत. म्हणूनच, आपल्या महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला नेण्यात येत असल्याचं सूचवत शरद पवारांनी मोदींवर नाव न घेता हल्लाबोल केला. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या महाराष्ट्रातील सभांना ८ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. त्यामुळे, पुढील काही दिवसांत राज्यातील राजकीय वातावरण तापणार असून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी मोठ्या प्रमाणात झडल्या जाणार आहेत.